नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १२८ * * अमरावती * मंगळवार, दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## आरएसएस कार्यालयाची रेकी

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १० :
गुजरात एटीएसने केंद्रीय यंत्रणांसोबत संयुक्त कारवाईत अहमदाबादमधून तीन आयसिस दहशतवाद्यांना अटक केली आहे. या दहशतवाद्यांनी गुजरात आणि देशभरात मोठ्या प्रमाणावर दहशतवादी हल्ल्यांची योजना रचत असल्याचे उघड झाले आहे.

तपासात असे समोर आले आहे की या आरोपींनी लखनौमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) कार्यालय आणि दिल्लीतील आझादपूर मंडीची गुप्तचर यंत्रणा चालवली होती. अटक केलेल्या आरोपींची ओळख आझाद सुलेमान शेख, मोहम्मद सुहेल आणि अहमद मोहिउद्दीन सय्यद अशी झाली आहे. तपासानुसार शेख आणि सुहेल यांनी राजस्थानातील हनुमानगडमधून शस्त्रे गोळा केली होती.

अग्राग्रलेख



## खरीखरी...

## लाल किल्ला, कसा हिलला?

आज भारताच्या अस्मितेवरती घाला घालण्यात आला आहे. आपल्या राजधानी दिल्ली येथील ज्या लाल किल्ल्यावरून स्वतंत्र दिनाच्या दिवशी भारताच्या सर्व पंतप्रधानांनी देशाला आणि जगाला भारताच्या दृढतेचा, भारताच्या अस्मितेचा आणि भारताच्या विजिगिषू वृत्तीचा जयघोष केला. त्याच लाल किल्ल्याजवळ तीन कारचे जबरदस्त बॉम्बस्फोट झाल्यामुळे संपूर्ण देश हादरलेला आहे. देशाच्या राजधानीमध्ये लाल किल्ल्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणावर झालेले हे बॉम्बस्फोट केवळ चिंता जनकच नाहीत, तर आपल्या देशातील गुप्तचर यंत्रणेला ही जबरदस्त चपराक आहे, एक जबरदस्त आव्हान आहे. या बॉम्ब स्फोटामुळे फक्त सरकारवर टीका करून भागणार नाही कारण देशातील इतर सरकारांच्या वेळीही असेच जबरदस्त स्फोट आपण अनुभवलेले आहेत. मुंबईच्या स्फोट मालिकेने देश हादरला होता, चिकमंगळूर येथील स्फोटामध्ये तर आपले माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा बळी घेतला होता. त्यामुळेच या स्फोटामुळे भारताच्या प्रतिमेवर किती आणि कसा विपरीत परिणाम अखिल विश्वात होऊ शकतो, याचा विचार करून आमच्या डोक्याचा पार चेंदामेंदा होत आहे. आपला देश केवळ निवडणुकीच्या वातावरणात राहतोय की काय, असाही विचार मनात येतो. आजच्या या स्फोटामध्ये १3 लोकांचे बळी गेले आणि ४० जण जखमी आहेत इतकीच माहिती आत्तापर्यंत तरी आमच्या हाती आलेली नाही. पण हे सर्व स्फोट होण्यापूर्वी आपल्या गुप्तचर यंत्रणा झोपल्या होत्या की काय, याचाही शोध घेतला पाहिजे. गुप्तचर यंत्रणा नेमक्या कोणत्या कामामध्ये गुंतल्या होत्या याचा शोध घेतल्यावर यंत्रणांचे कामकाज काय ते कळू शकेल. आजकाल कितीही मोठी घटना घडो, आपण लपवाछपवीचा प्रयत्न करतो. पण कोंबडा आरवला नाही तरी सूर्य उगवतोच. त्याप्रमाणे कितीही सारवासारव केली तरी आताच्या काळात सोशल मीडियामुळे कोणतीही गोष्ट लपून राहत नाही. आज घडलेले स्फोट बिहार निवडणुकीच्या तोंडावर झालेले आहेत. याचा आणि निवडणुकीचा काही संबंध आहे असे आपण खात्रीलायकरीत्या सांगू शकत नाही. तरीही कोणत्याही परिस्थितीत देशाच्या राजधानी मधला आणि तोही लाल किल्ल्या जवळचा हा विस्फोट अत्यंत घातक परिणाम करणार आहे यात शंका नाही. देशाच्या राजकीय आणि सरकारी यंत्रणांना या सर्व घटनांचा गंभीरपणे विचार करावा लागेल हे तितकेच महत्त्वाचे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ स्फोट

# १3 जणांचा मृत्यू

४० हून अधिक नागरिक जखमी

दिल्ली, मुंबईत हाय अलर्ट

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :
सोमवारी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळील पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका कारचा अचानक स्फोट झाला. आग इतक्या वेगाने पसरली की जवळच उभ्या असलेल्या तीन कारही जळून खाक झाल्या. या घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला असून, ४० पेक्षा अधिक जखमी झाले आहेत.

माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि आगीवर नियंत्रण मिळवले. अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की स्फोटाचे कारण तपासले जात आहे.



पोलिसांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आहे आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी उपस्थित आहे. आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. दिल्लीत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

एलएनजेपी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी सांगितले की, जखमींपैकी ११ जणांचा मृत्यू झाला आहे. लोक नायक जय प्रकाश नारायण (एलएनजेपी) रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांनी एएनआयला सांगितले की, लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ झालेल्या स्फोटात जखमी झालेल्या १५ जणांना लोक नायक रुग्णालयात आणण्यात आले आहे. त्यापैकी आठ जणांचा रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झाला. अनेक गंभीर जखमी असून काहींची प्रकृती स्थिर आहे.

## धर्मेंद्र व्हेंटिलेटरवर

प्रकृती चिंताजनक : मुलींना अमेरिकेतून बोलावले

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :



ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेते धर्मेंद्र यांची प्रकृती सोमवारी अचानक बिघडली. त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे. माहितीनुसार, श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले आहे. डॉक्टरांची एक टीम त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहे. त्यांच्या प्रकृतीबाबत कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. डॉक्टरांचे म्हणणे आहे की पुढील ७२ तास धर्मेंद्र यांच्यासाठी अत्यंत कठीण असतील.

धर्मेंद्र यांचे कुटुंबीय रुग्णालयात उपस्थित आहेत, तर त्यांच्या मुलींना अमेरिकेतून बोलावण्यात आले आहे. अलिकडेच त्यांच्या आगामी "इक्किस" चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला, ज्यामध्ये त्यांनी दमदार अभिनय केला आहे.

## डॉक्टराच्या खोलीतून ३०० किलो आरडीएक्स जप्त

जम्मू काश्मीर पोलिसांचा छापा : एके-४७ जप्त





■ वृत्तसंस्था, गुरुग्राम, दि. १० :
जम्मू आणि काश्मीरमधील अनंतनाग येथील रहिवासी डॉ. आदिल अहमदला पोलिसांनी उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथून अटक केली. त्याच्या घरावर छापा टाकून सुमारे ३०० किलो आरडीएक्स जप्त केली आहेत. त्यांना एके-४७ आणि दारूगोळा देखील सापडला आहे.

त्या डॉक्टरचे नाव आदिल अहमद आहे. आदिल पूर्वी अनंतनाग येथील जनरल हॉस्पिटलमध्ये प्रॅक्टिस करत होता. २०२४ मध्ये त्याने तिथून राजीनामा दिला. त्यानंतर त्याने सहारनपूरमध्ये प्रॅक्टिस सुरू केली. डॉ. आदिलने दिलेल्या माहितीवरून, पुलवामा (काश्मीर) येथून मुजाहिल शकील या दुसऱ्या डॉक्टरला अटक करण्यात आली.

## ..तर तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वात चौकशी करा

नाना पटोलेंचे मुख्यमंत्र्यांना आव्हान : पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा / नागपूर, दि. १० :
उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या जमीन घोटाळ्याप्रकरणी चौकशी केली जाणार आहे. मुख्यमंत्री फडणवीसांमध्ये हिंमत असेल तर त्यांनी तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात चौकशी समिती गठित करावी, असे आव्हान कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी दिले आहे.

नाना पटोले म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी विकास खरगेंच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली आहे. या पद्धतीच्या चौकशीचा आणि कमिटीचा फार्स करून जनतेची जी दिशाभूल चाललेली आहे. महाराष्ट्र रोज लुटण्याचे काम सुरू आहे. खरोखरच हिंमत असेल आणि दूध का दूध, पाणी का पाणी करायचे असेल तर तुकाराम मुंढेंच्या अध्यक्षतेखाली कमिटी बसवा.

पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, पार्थ पवारांच्या 1800 कोटींच्या जमीन घोटाळ्यात औद्योगिक नवीन धोरण आणायचे आणि स्टॅम्प ड्युटी वाचवण्याचे धोरण ही फक्त एक पद्धत आहे. मुंबई आणि बीकेसी मधील 500 एकर पेक्षा अधिक जमीन, सी लिंकच्या बाजूची जमीन, रस्ते विकास महामंडळाची जमीन, या सगळ्या जमिनी कशा आणि काय भावाने दिल्या? नवी मुंबईचे मार्केट यार्ड होते, ती जमीन मोदीजींच्या मित्रांना आयटी पार्कच्या नावाने देण्यात आली.



महाराष्ट्रात अशा अनेक प्रकारच्या जमीन घोटाळ्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्याची चौकशी बसवण्याची गरज नाही, ते कागदावरच स्पष्ट होते. शासन तुम्ही चालवत आहात, सरकार तुम्ही चालवत आहात, अशा वेळेस चौकशी बसवायची गरजच काय? असा प्रश्न नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे.

पार्थ पवार यांच्या कंपनीने पुण्यातील मुंढव्यातील 1800 कोटींची जमीन 300 कोटींमध्ये लाटण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी असलेली 21 कोटींची स्टँप ड्युटीही भरली नाही. हे प्रकरण समोर आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खरगे यांच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. यावरून नाना पटोले यांनी टीका केली आहे.

## रुपाली पाटील, मिटकरींची प्रवक्ते पदावरून हकालपट्टी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
रुपाली पाटील व आमदार अमोल मिटकरी यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या प्रवक्ते पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. रुपाली पाटील यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर हल्ला चढवला होता. तर मिटकरी यांच्या विधानांमुळे महायुतीत तणाव निर्माण होताना दिसून येत होता. परिणामी राष्ट्रवादी कॉंग्रेसने या दोघांनाही प्रवक्ते पदावरून दूर केले.



राष्ट्रवादी कॉंग्रेसने सोमवारी पक्षाच्या 17 नव्या प्रवक्त्यांची यादी जाहीर केली. त्यात रुपाली पाटील व अमोल मिटकरी या 2 नेत्यांची नावे नाहीत. या यादीद्वारे राष्ट्रवादीने अनिल पाटील, चेतन तुपे, सना मलिक, हेमलता पाटील, राजीव साबळे, सायली दळवी, रुपाली चाकणकर, आनंद परांजपे, राजलक्ष्मी भोसले, प्रतिभा शिंदे, प्रशांत पवार, शशिकांत तरंगे यांच्यासह अनेकांना संधी दिल्याचे दिसून येते.

## शिंदेसेनेचे आमदार अब्दुल सत्तार पुन्हा गोत्यात?

आमदार निधीचा गैरवापर केल्याचा आरोप

■ वृत्तसंस्था
छत्रपती संभाजीनगर, दि. १० :
शिंदे-फडणवीस सरकारमधील वादग्रस्त वक्तव्ये आणि कथित गैरव्यवहारांच्या आरोपांमुळे सातत्याने चर्चेत राहिलेले शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार अडचणीत येण्याची शक्यता आहे.



2014 सालच्या रुग्णवाहिका खरेदी प्रकरणात सिल्लोड न्यायालयाने पोलिसांना तपास करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावरच अब्दुल सत्तार यांची राजकीय कोंडी होण्याची शक्यता राजकीय वतुर्ळात वर्तवली जात आहे.

आमदार अब्दुल सत्तार यांनी 2014 मध्ये मंत्री असताना प्रत्येकी 16 लाख रुपये खर्चून दोन रुग्णवाहिका खरेदी केल्या होत्या. यासाठी त्यांनी स्वतःच्या आमदार निधीतील पैशांचा वापर केला होता.

मात्र, शासकीय नियमांना बगल देत, या दोन्ही रुग्णवाहिका सत्तार यांच्याच मालकीच्या असलेल्या प्रगती शिक्षण संस्थेला देण्यात आल्या होत्या. शासकीय नियमानुसार, कोणत्याही खासगी रुग्णालय किंवा संस्थेला सरकारी पैशाने रुग्णवाहिका देता येत नाहीत.

अब्दुल सत्तार यांनी शासकीय नियम धाब्यावर बसवून शासनाची दिशाभूल केली आणि सरकारी संपत्तीचा अपहार केल्याचा आरोप आहे. त्यांनी शासनाची कोणतीही परवानगी न घेता हा व्यवहार मंजूर केला आणि संस्था स्वतःची असल्याची बाब लपवली, असे तक्रारीत म्हटले आहे.

दरम्यान, या प्रकरणात कोर्टाच्या आदेशानंतर पोलिसांच्या अहवालाकडे सर्वांचे लक्ष आहे.

## आरएसएस रजिस्टर्ड आहे का? उत्तर द्या!



■ वृत्तसंस्था, जालना, दि. १० :
वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीय स्वयं सेवक संघावर पुन्हा एकदा हल्लाबोल केला आहे. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विट करत संघाला उद्देशून तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. आरएसएस रजिस्टर्ड संस्था आहे का? नसेल, तर इतके फंडिंग कसे काय मिळत आहे? तसेच संघाने भारतीय तिरंगा स्वीकारला नव्हता, हे खरे आहे की खोटे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

बकवास बंद करा आणि माझ्या तीन प्रश्नांचे उत्तर द्या, असे म्हणत प्रकाश आंबेडकर यांनी आरएसएसवर हल्लाबोल केला आहे.

## आगीत चौघांचा कोळसा

■ वृत्तसंस्था, सांगली, दि. १० :
भांड्याच्या दुकानाला लागलेल्या आगीत दुकान मालकासह त्याच्या कुटुंबातील चौघांचा होरपळून मृत्यू झाल्याची दुदैवी घटना सांगलीच्या विटा शहरात घडली आहे. सोमवारी सकाळी 8.30 च्या सुमारास घडलेली ही घटना शॉर्टसर्किटमुळे घडल्याचा अंदाज आहे.

अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग विझवण्याचा प्रयत्न केला. पण तोपर्यंत दुकान मालक विष्णू पांडूरंग जोशी (47), त्यांची पत्नी सुनंदा विष्णू जोशी (42), मुलगी प्रियंका योगेश इंगळे (25) व नात सृष्टी योगेश इंगळे (2) या चौघांचा जागीच होरपळून मृत्यू झाला होता. विटा येथील सावरकरनगरमध्ये विष्णू जोशी यांचे जय हनुमान स्टील सेंटर हे भांडी व फर्निचरचे मोठे दुकान आहे.

## आपल्याच सरकारच्या निर्णयाचा अभाविपकडून विरोध

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
राज्याच्या महायुतीचे सरकार असून यामध्ये भाजप सर्वात मोठा पक्ष आहे. तर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील भाजपचेच आहेत. मात्र, भाजप परिवारातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संघटना असलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने राज्य शासनाच्या प्राध्यापक भरतीच्या शासन निर्णयाला कडाडून विरोध केला आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या प्राध्यापक भरतीच्या शासन निर्णयामध्ये काही निकषांमध्ये बदल करत शैक्षणिक, अध्यापन, संशोधनासाठी ७५ गुण, तर मुलाखतीसाठी २५ गुण निश्चित केले. अभाविपने या सूत्राला विरोध करत विद्यापीठ अनुदान आयोगान (यूजीसी) मान्यता दिलेले ५०:५० गुणांचे सूत्र अवलंबावे अशी मागणी केली आहे. सरकारने आपला निर्णय बदलला नाही तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारण्याचा इशाराही अभाविपने दिला आहे.

## ईनामी नक्षलवाद्याचे आत्मसमर्पण



■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. १० :
गोंदिया जिल्हा पोलिसांनी नक्षलविरोधी अभियानात महत्त्वपूर्ण यश मिळवले असून, ३.५ लाखांचे बक्षीस असलेल्या जहाल माओवादी वर्गेश उर्फ कोसा मंगलु उईका (मूळ नाव कोसा मंगलु उईका) याने आज, १० नोव्हेबर रोजी आत्मसमर्पण केले आहे. गोंदियाचे जिल्हाधिकारी प्रजित नायर आणि पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या समक्ष आत्मसमर्पणाची ही प्रक्रिया पार पडली.

हा माओवादी २६ वर्षीय असून, तो मूळचा छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यातील कोंटा तालुक्यातील बेदरे येथील रहिवासी आहे. माओवादी संघटनेतील वरिष्ठ कॅडरची मनमानी, फंडच्या नावाखाली चाललेली पैशाची लुटमार, खोटी ध्येय-धोरणे, त्रास व अत्याचारास कंटाळून त्याने हिंसेचा मार्ग सोडण्याचा निर्णय घेतला.

कोसा याने अनेक नक्षल घटनांमध्ये भाग घेतला. गोंदिया जिल्हा पोलीस प्रशासनासमोर आतापर्यंत २५ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे.

संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, म.रा. नागपूर, अंकित गोयल, पोलीस उप-महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, प्रजित नायर, जिल्हाधिकारी गोंदिया, गोरख भामरे, पोलीस अधीक्षक गोंदिया व अभय डोंगरे, अपर पोलीस अधीक्षक गोंदिया यांच्या मार्गदर्शनाखाली नक्षल सेल गोंदिया येथील पो.नि. प्रमोद भातनाते, सपोनि. संजय नाईक, पोउपनि. श्रीकांत हत्तीमारे, पोहवा. सुरेश चंद्रीकापुरे, पो.शि. अतुल कोल्हाटकर, आशिष वंजारी, राजेश तवाडे, तसेच पोहवा. अनिल कोरे, म.पो.शि. लिना मेश्राम यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# स्थानिकच्या निवडणुकीत भाजपा, कॉंग्रेस स्वबळावर?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर/मुंबई, दि. १० :
नगर पालिका आणि नगर पंचायतच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. दोन महिन्यात सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहे. त्या कशा लढायच्या याचा पेच अद्यापही कायम आहे. परंतु, आज भाजपा आणि कॉंग्रेसकडून त्यांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. कार्यकर्त्यांचा आग्रह हे मुख्य कारण पुढे करीत आपण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याचे भाजप आणि कॉंग्रेसने स्पष्ट केले आहे.

भाजपाच्या कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावरच लढवू, अशा तीव्र भावना कार्यकर्त्यांनी आपल्याकडे व्यक्त केल्या आहे. त्या पाहाता स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहे असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे माध्यमांसोबत बोलताना सांगितले. त्यामुळे नागपूर जिल्ह्यात महायुती होणार नसल्याचेही स्पष्ट झाले आहे.

लोकसभा आणि विधानसभा एकत्र लढल्यामुळे स्थानिक निवडणुकाही महायुती एकत्रच लढणार असल्याचे सुरुवातीला भाजपने जाहीर केले होते. त्यानंतर स्थानिक पदाधिकाऱ्यांना याचे अधिकार दिले आहे, त्यात वरिष्ठ नेते हस्तक्षेप करणार नाही, अशी असेही भाजपच्या नेत्यांनी स्पष्ट केले होते.

नगर पालिका आणि नगर पंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर महायुती आणि जागावाटपाच्या बोलणीसाठी भाजपने पुढाकार घेतला नाही. आजपासून नगर पालिकाला, पंचायतीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात देखील झाली. या पार्श्वभूमीवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांसोबत बोलताना भाजप स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याचे जाहीर केले आहे.



दोन दिवसांपूर्वी अजित पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना आपल्याला स्वबळावर लढायचे असल्याने तयारीला लागण्याचे निर्देश दिले होते. भाजप नेत्यांकडून महायुतीबाबत प्रतिसाद मिळत नसल्याचे त्यावेळी सांगण्यात आले होते. दुसरीकडे कॉंग्रेसतर्फेसुद्धा नागपूर ग्रामीणमध्ये शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि उद्धव ठाकरे सेनेसोबत आघाडीचे बोलणी टाळत आहे. हे बघता आता स्थानिकमध्ये सर्वांनाच स्वबळावर लढावे लागणार आहे.

दुसरीकडे, कॉंग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. आगामी मुंबई महापालिकेची निवडणूक कॉंग्रेस पक्ष स्वबळावर लढण्याची घोषणा विजय वडेट्टीवार यांनी केली. जर उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून काही प्रस्ताव आल्यास त्यावरही विचार करणार असल्याचे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

विजय वडेट्टीवार म्हणाले, आम्ही हायकमांडबरोबर चर्चा केल्यानंतर आम्ही स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचा अधिकार दिलेला आहे. आमच्या लोकांनी सुद्धा तेच ठरवलेले आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी मित्रपक्षाचा प्रस्ताव आल्यास, त्यावर चर्चा नक्की होईल. शरद पवारांकडून चर्चेचा प्रस्ताव आला, तर त्यावर आम्ही चर्चा करू, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

# एकनाथ शिंदेंनी घेतला युतीबाबत मोठा निर्णय



**मुंबई :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचं बिगूल वाजलं आहे. काही ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुतीमध्ये लढवल्या जाण्याची शक्यता आहे, तर काही ठिकाणी महायुतीमधील तीनही पक्ष हे स्वबळावर निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. या निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटानं पुण्यात पतित पावन संघटनेसोबत युती केली आहे. पुण्यात पतित पावन संघटना आणि शिवसेनेचा एकत्र मेळावा पार पडला, या मेळाव्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या अनेक नेत्यांची उपस्थिती होती.

यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. पतित पावनला जिथे जिथे एकनाथ शिंदेंची गरज लागेल तिथे भाऊ म्हणून तुमच्या पाठीमागे उभा राहणार. बाळासाहेबांना नको होतं ते होऊ लागले तेव्हा एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उठाव केला. विकास होतच असतो. पण संस्कृती जपली पाहिजे. मुख्यमंत्री असताना अडीच वर्षांमध्ये संस्कृती जोपासली, आणि महाराष्ट्राला विकासाकडे नेलं. सत्तेची खुर्ची पाहून रंग बदलणारे आमचे हिंदुत्व नाही, असा हल्लाबोल यावेळी शिंदे यांनी केला आहे.

# शेलारांच्या शेजारच्या इमारतीत मतदार यादीत असा झोल



**मुंबई :** मंत्री आशिष शेलार यांच्या मतदारसंघातील मतदार याद्यांचा घोळ मनसेने बाहेर आणला आहे. मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन काही धक्कादायक खुलासे केले आहेत. आशिष शेलार दुसऱ्यांचे मतदारसंघ शोधून काढतात. आपलं ठेवायचं झाकून, दुसऱ्याचं बघायचं वाकून अशी आशिष शेलारांची सवय आहे. त्यांच्या मतदारसंघात शोध घेतल्यानंतर मतदार यादीतील घोटाळे बाहेर आले. त्यातले तीन ते चार घोटाळे आपल्यासमोर मांडतोय. त्याची रीतसर तक्रार रिर्टनिंग ऑफिसरकडे करणार आहोत, असं संदीप देशपांडे म्हणाले.

आशिष शेलार राहतात, त्याच्या बाजूला सारंग तरंग बिल्डिंग आहे. या सारंग तरंग बिल्डिंगमध्ये 1 ते 28 नंबर पर्यंत फ्लॅट आहेत. जिथे 1 ते 28 घर क्रमांक आहे, त्या इमारतीत दोन नाव आढळली. समुद्री बासू कलको या महिला असाव्यात, त्यांच्या पतीच नाव बासू कलको असावं. घर क्रमांक 455. ज्या इमारतीत 1 ते 28 फ्लॅट आहेत, तिथे 455 क्रमांकाचा फ्लॅट कुठून आला?. आमचे विभागअध्यक्ष तिथे राहतात. तिथे कुठलही 455 क्रमांकाच घर नाही. सोसायटीच्या सेक्रेटरीशी आम्ही बोललो. असा कुठला माणूस तिथे भाड्याने रहायला आला होता का? त्यांनी नाही असं सांगितलं. त्याचं सोसायटीत दुसरं नाव आहे, अनिताराज ऋतेश्वर. पतीच नाव ऋतेश्वर राजशेखरन शिवराज घर क्रमांक आहे 12/33 . हा कुठला क्रमांक आहे माहित नाही. या सारंग तरंग सोसायटीत कोणतीही व्यक्ती 15-30 वर्ष राहिलेलं नाही. मग यांचं नाव मतदार यादीत कसं आलं? याचं संशोधन निवडणूक आयोगाने करावं असं संदीप देशपांडे म्हणाले.

# बच्चू कडूंच्या प्रहारची रत्नागिरीत एंट्री



**रत्नागिरी :** निवडणुकांच्या या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व प्रमुख राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांमध्ये जागावाटपाबाबत अद्याप एकमत झालेले नसताना, प्रहार जनशक्ती पक्षाने मात्र स्वतंत्रपणे निवडणुका लढवण्याची घोषणा केली आहे. प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी रत्नागिरी नगरपरिषदेची निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

बच्चू कडूंनी सांगितले की, प्रहार जनशक्ती पक्ष आता रत्नागिरी नगरपरिषदेच्या निवडणुकीत 5 ते 6 जागांवर आपले उमेदवार उभे करणार आहे. या निर्णयामुळे कोकणातील राजकारणात नव्या समीकरणांची सुरुवात होण्याची चिन्हे आहेत. आतापर्यंत कोकणातील राजकारण शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसपुरतेच मर्यादित होते. मात्र, प्रहार पक्षाने थेट नगरपरिषदेच्या रणांगणात उतरण्याची तयारी दर्शवल्याने नवा राजकीय खेळ सुरू होण्याची शक्यता आहे. कडूंनी सांगितले की, रत्नागिरीसह कोकणातील मतदारांनी प्रहारच्या कामाचा आणि भूमिकेचा विचार करावा, कारण प्रहार नेहमी सर्वसामान्यांच्या हक्कासाठी लढणारा पक्ष आहे. कडूंनी निवडणूक प्रक्रियेवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले.

# राज ठाकरेंचे मुंबई मिशन सुरू

## मनसेचा १२५ प्रभागांवर दमदार दावा ■ उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत युतीचे समीकरण रंगणार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० :**
मुंबई महापालिका निवडणुकीची चाहूल लागल्याने शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या निवडणुकीसाठी उमेदवार आणि पक्ष दोघेही तयारीत व्यग्र झाले आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या 227 प्रभागांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून 11 नोव्हेंबर रोजी ही सोडत पार पडणार आहे. या सोडतीनंतर कोणते प्रभाग महिला, मागासवर्गीय किंवा सर्वसाधारण खुल्या वर्गासाठी राखीव राहतील, हे निश्चित होणार आहे. त्यामुळे उमेदवार, पक्षप्रमुख आणि स्थानिक नेत्यांची नजर या सोडतीवर खिळली आहे. निवडणूक आयोगाने आरक्षण प्रक्रियेचे वेळापत्रकही प्रसिद्ध केले असून नोव्हेंबर अखेरपर्यंत अंतिम आरक्षण जाहीर होणार आहे.

मुंबई महापालिका ही देशातील सर्वात श्रीमंत आणि प्रभावशाली महानगरपालिका मानली जाते. त्यामुळे या निवडणुकीवर सर्वच पक्षांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. शिवसेना ठाकरे गट, भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, शिवसेना शिंदे गट आणि मनसे यांच्यात प्रचंड स्पर्धा आहे. दरम्यान, मनसेनेही या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शिवसेना ठाकरे गटासोबत युती होण्याची शक्यता लक्षात घेऊन मनसेकडून 227 प्रभागांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. मुंबईतील माहीम, दादर, परळ, लालबाग, विक्रोळी, भांडुप आणि घाटकोपरसारख्या मराठी मतदारसंख्येने भरलेल्या भागांमध्ये मनसेने आपली ताकद दाखवण्याची तयारी केली आहे.

मनसेच्या बैठकींमधून मिळालेल्या माहितीनुसार, पक्षाने मुंबईतील 125 प्रभागांवर आपली स्थिती मजबूत असल्याचे आढळले आहे. या सर्व जागांवर योग्य उमेदवारांची निवड करण्याचे काम सुरू आहे.

राज ठाकरेंच्या नेतृत्वाखाली मनसेकडून या जागांवर थेट उमेदवार रिंगणात उतरवले जाण्याची शक्यता आहे. युती झाल्यास जागा वाटपात या प्रभागांना प्राधान्य दिले जाईल, अशी पक्षातील सूत्रांची माहिती आहे.

शिवसेना ठाकरे गट आणि मनसे या दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे आपली ताकद असलेल्या जागांचा अभ्यास सुरू ठेवला असून, युती झाल्यास या जागांवरच मुख्य फोकस राहणार आहे. मनसेच्या मुंबईतील बैठकींना चांगला प्रतिसाद मिळत असल्याने पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नव्या जोशाची भावना दिसून येत आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी 11 नोव्हेंबरला प्रत्यक्ष आरक्षण सोडत काढली जाईल. त्यानंतर 14 ते 20 नोव्हेंबरदरम्यान नागरिक आणि पक्षांकडून हरकती, सूचना स्वीकारल्या जातील. 21 ते 27 नोव्हेंबरदरम्यान आयुक्त या हरकतींवर विचार करून अंतिम निर्णय घेतील, आणि अखेरीस 28 नोव्हेंबर रोजी अंतिम आरक्षण जाहीर केले जाईल. या संपूर्ण प्रक्रियेवर सर्व पक्षांनी बारकाईने लक्ष ठेवले असून, आरक्षणानंतरच उमेदवार निवडीची आणि युतीच्या जागावाटपाची चर्चा सुरू होईल.

शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांची युती होणार की नाही, याबाबत अद्याप स्पष्ट संकेत मिळालेले नाहीत. मात्र दोन्ही पक्षांकडून स्वतंत्रपणे प्रभागनिहाय ताकद मोजण्याचं काम सुरू आहे.

ठाकरे गटाला परळ, दादर, शिवडीसारख्या भागांमध्ये मजबूत पकड आहे, तर मनसेने माहीम, लालबाग, घाटकोपर आणि विक्रोळी या भागांमध्ये पुन्हा एकदा संघटन मजबूत केलं आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये जागावाटप करताना अनेक जागांवर थेट स्पर्धा निर्माण होऊ शकते. दरम्यान, भाजप आणि शिंदे गटानेही स्वतंत्र तयारी सुरू ठेवली असून, मुंबईतील सत्तेची लढाई चुरशीची होण्याची चिन्हे दिसत आहेत. 11 नोव्हेंबरला आरक्षण सोडत जाहीर होताच या निवडणुकीचा खरा राजकीय रंग चढणार आहे.



### राज ठाकरे यांच्या सुरक्षेत वाढ

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या सुरक्षेत अचानक वाढ करण्यात आलीय. मुंबई येथील त्यांच्या शिवतीर्थ निवासस्थानाबाहेर पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला. दोन दिवसांपूर्वी शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या घराभोवती ड्रोन घिरट्या घालत आहेत, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला होता. त्यातच ही बातमी समोर आली. पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांच्या सुरक्षेचा आढावा घेतला. दर दोन तासांनी त्यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानाभोवती गस्त घालण्यात येत आहे.

राज ठाकरे यांना भीती आहे म्हणून सुरक्षेत वाढ केली की, सत्ताधाऱ्यांना भीती आहे म्हणून त्यांच्या सुरक्षेत वाढ केली, असा सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. तर दुसरीकडे कोणाला सुरक्षा द्यायची आणि द्यायची नाही. याची एक समिती असते, असे मंत्री संजय शिरसाट म्हणाले.

# राज्यभरात स्थानिकच्या निवडणुकीची रणधुमाळी!

## नगरपरिषदांच्या रणांगणात पक्षांमध्ये उमेदवारांसाठी चढाओढ : स्थानिक आघाड्यांचे वर्चस्व वाढणार?

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. १० :**
राज्यात पुन्हा एकदा राजकीय तापमान चढले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला असून आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. २४६ नगरपरिषद आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यास आज (१० नोव्हेंबर) पासून सुरुवात झाली आहे.

निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर करताच राज्यभरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. सर्वच पक्षांकडून उमेदवारांच्या मुलाखती सुरू असून अनेक ठिकाणी गटबाजी, नाराजी आणि स्थानिक आघाड्यांची चाचपणी सुरू झाली आहे.

महायुती व महाविकास आघाडीमध्ये राज्यस्तरावरील चर्चेचा निष्कर्ष अद्याप निघालेला नसल्याने, अनेक ठिकाणी पक्षीय चिन्हाऐवजी स्थानिक आघाड्यांच्या जोरावर निवडणूक लढवली जाण्याची शक्यता आहे.

या निवडणुकीत २८८ अध्यक्ष आणि ६,८५९ सदस्य निवडले जाणार असून २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आठ दिवसांची मुदत देण्यात आली असून १७ नोव्हेंबर हा अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस, १८ नोव्हेंबरला अर्जांची छाननी आणि २१ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत.

यंदा उमेदवारांना ऑनलाइन अर्ज भरून त्याची प्रिंट निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करावी लागणार आहे. राज्यातील २४७ नगरपरिषदांपैकी ३३ पदे अनुसूचित जातींसाठी, ११ पदे अनुसूचित जमातींसाठी, ६७ पदे मागास प्रवगार्साठी, तर १३६ पदे खुल्या प्रवगार्साठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

**पुणे जिल्ह्यात ६.३४ लाख मतदार**
**१७ स्थानिक संस्था रणांगणात**

पुणे जिल्ह्यातील १४ नगरपरिषदा आणि ३ नगरपंचायतींसाठी निवडणूक जाहीर झाली असून, आचारसंहिता लागू झाली आहे. १ जुलै २०२५ च्या मतदार यादीप्रमाणे जिल्ह्यात एकूण ६,३४,९४० मतदार आहेत.

बारामती ही अ वर्गातील नगरपरिषद असून, लोणावळा, दौंड, चाकण, तळेगाव दाभाडे आणि फुरसुंगी-उरळी देवाची या नगरपरिषदा ब्बह्न वर्गात येतात. सासवड, जेजुरी, इंदापूर, शिरूर, जुन्नर, आळंदी, भोर आणि राजगुरूनगर या क वर्गातील नगरपरिषदा आहेत.

मंचर, वडगाव मावळ आणि माळेगाव बुद्रुक या नगरपंचायतींसाठीही आचारसंहिता लागू झाली असून या नगरपंचायतींसाठी पहिल्यांदाच निवडणूक होणार आहे.

विशेष म्हणजे, फुरसुंगी-उरळी देवाची नगरपरिषदेत प्रथमच निवडणूक होत आहे. ही निवडणूक द्विसदस्यीय पद्धतीने होणार असून एकूण १६ प्रभागांतून ३२ नगरसेवकांची निवड केली जाणार आहे. अध्यक्षपदासाठी थेट मतदान होणार असल्याने या नगरपरिषदेकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या या निवडणुकीमुळे पुन्हा एकदा स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे ढवळून निघणार आहेत. कोण जिंकणार स्थानिक सत्तेची लढाई, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

# अजित पवारांचा स्वबळाचा इशारा

■ **दीपक कैतके, मुंबई, दि. १० :**
राज्यातील महायुतीत अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचे सूतोवाच करून राजकीय वर्तुळात खळबळ माजवली आहे.



पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीदरम्यान पवारांनी पुरंदर, दौंड, शिरूर, जुन्नर, खेड, आंबेगाव आणि मुळशी तालुक्यांतील पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. या वेळी अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यानंतर माध्यमांशी बोलताना अजित पवार म्हणाले, आरक्षणाचा निकाल लागल्यानंतर, स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल.

यावरून स्पष्ट संकेत मिळतात की, स्थानिक स्तरावर राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्रपणे लढू शकते. अजित पवार म्हणाले, पूर्वी महायुती एकत्र लढवावी, अशी भूमिका होती; पण आता स्थानिक स्तरावर वेगळे मतप्रवाह आहेत. निवडणूक कशी लढायची, याचा अधिकार स्थानिक नेत्यांनाच असेल.

त्यांनी महाविकास आघाडीचा दाखला देत सांगितले की, आम्ही आघाडीत असतानाही लोकसभा आणि विधानसभा वगळता इतर निवडणुका स्वतंत्रपणेच लढलो होतो. याच भूमिकेची पुनरावृत्ती आता दिसून येत आहे.

दरम्यान, शरद पवार यांच्या गटाकडून भाजपसोबत युती करू नका अशा सूचना दिल्याची माहिती आहे. ओबीसी प्रवर्गातील आरक्षण राखले जावे आणि मूळ ओबीसींनाच उमेदवारी द्यावी, अशा सूचना देण्यात आल्याचंही वृत्त आहे. दोन्ही राष्ट्रवादी निवडणुकीत एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# २० कोटींच्या ऑफरचा व्हिडिओ व्हायरल

## संतोष देशमुख हत्या प्रकरण



■ **महासागर प्रतिनिधी, बीड, दि. १० :**
बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग या गावात झालेल्या सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येला वर्ष उलटलं असलं तरी हे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. कारण, सोशल मीडियावर संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांना 20 कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

या व्हिडिओमध्ये ही ऑफर धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांचा मुलगा सुशील कराड यांच्या माध्यमातून देण्यात आल्याचा दावा केला गेला आहे. तसेच, ही चर्चा शासकीय अंगरक्षक संतोष जाधव यांच्या उपस्थितीत झाल्याचंही यात सांगितलं जात आहे. मात्र, या व्हिडिओची सत्यता अजूनही तपासात असून, कोणत्याही वृत्तसंस्थेने त्याची पुष्टी केलेली नाही.

संतोष देशमुख यांच्या हत्येने बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडलं होतं. 9 डिसेंबर 2024 रोजी त्यांचं अपहरण करून त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यात आला आणि नंतर त्यांची हत्या करण्यात आली. त्यांचा मृतदेह गावाजवळ सापडला होता. तपासादरम्यान धनंजय मुंडे यांचे निकटचे सहकारी वाल्मिक कराड यांच्या खंडणी रॅकेटचा या हत्येत सहभाग असल्याचं समोर आलं होतं. या प्रकरणात अनेकांना अटक झाली असून, प्रमुख आरोपी वाल्मिक कराड सध्या तुरुंगात आहे, तर आणखी एक आरोपी कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे. या प्रकरणात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा म्हणजेच मकोका लागू करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा राजकीय प्रभाव सर्वाधिक जाणवला तो तत्कालीन मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर. तपासात त्यांचं नाव थेट आले नसले तरी त्यांच्या निकटवर्तीय वाल्मिक कराडवर गुन्हा दाखल झाल्याने त्यांच्यावर गंभीर आरोप झाले. हत्येतील अत्याचारांचे फोटो आणि व्हिडिओ सार्वजनिक झाल्यानंतर राज्यभर संतापाची लाट उसळली. वाढत्या दबावामुळे अखेर धनंजय मुंडेंना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला.

आता पुन्हा एकदा 20 कोटींच्या कथित ऑफरचा व्हिडिओ समोर आल्यानं या प्रकरणाची राजकीय धग नव्याने पेटली आहे. बीड जिल्ह्यात आणि राज्यभरात या व्हिडिओबाबत चर्चेला उधाण आलं आहे. पोलिस आणि तपास यंत्रणांकडून या व्हिडिओची सत्यता तपासली जाणार असून, त्यामागचं राजकारण काय आहे यावरही चौकशी होणार आहे.

# हिंद की चादर' गुरु तेगबहादूर यांचा ३५० व्या शहिदी समारंभ सोहळा



■ **महासागर प्रतिनिधी,मुंबई,दि. १० :**
धर्म आणि देशभक्तीच्या या अद्वितीय परंपरेचा गौरव करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत गुरु तेगबहादूर यांच्या ३५० व्या शहिदीदिनानिमित्त भव्य स्मृतिसोहळे नांदेड, नवी मुंबई, नागपूरसह देशात विविध ठिकाणी होत आहेत. या ऐतिहासिक कार्यक्रमात गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरीय समन्वय समिती स्थापन केली असून, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वरभाऊ नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ती कार्यरत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जगदीश सकवान हे कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. महाराष्ट्र शासनाने सर्व विभागांना अधिकृत परिपत्रक जारी केले असून, राज्यस्तरावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही शासन नियुक्त समिती विविध स्तरांवर समन्वय, प्रचार व प्रसाराचे कार्य यशस्वीपणे पार पाडत आहे.

या सोहळ्यामुळे बंजारा, लभाणा आणि शिख समाज यांच्यातील शतकानुशतकांचे गुरुबंधुत्व आणखी दृढ होईल. गुरु तेगबहादूर आणि बाबा लखीशाह बंजारा यांचे बलिदान व योगदान हे धर्म आणि मानवतेच्या रक्षणाचे तेजस्वी प्रतीक आहे. त्यांच्या शौर्याचा आणि श्रद्धेचा गौरव या स्मृतिसोहळ्याद्वारे पुन्हा उजाळा घेणार आहे.

या कार्यक्रमामुळे बंजारा समाजाच्या गौरवशाली, पराक्रमी आणि धर्मनिष्ठ इतिहासाला नवे बळ मिळणार असून गुरुबंधुत्वाचा हा पवित्र वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे, असे सांगत सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन धर्मरक्षक किसनभाऊ राठोड यांनी केले आहे.

भारतीय गोरबंजारा, लभाणा आणि शीख समाजाचा इतिहास हा त्याग, बलिदान, शौर्य, पराक्रमाचा रक्तरंजित इतिहास आहे. मानवतेच्या रक्षणासाठी स्वतःचे प्राण अर्पण करणारे हिंद की चादर गुरु तेगबहादूर साहिब हे भारताच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ शहिदांपैकी एक आहेत.

त्यांनी धार्मिक स्वातंत्र्य, सत्य आणि सहिष्णुतेसाठी दिलेले बलिदान हे इतिहासात अजरामर झाले आहे. त्यांच्या शौर्यशाली पराक्रमात बाबा लखीशाह बंजारा यांचेही योगदान आहे. बंजारा समाजाचा गौरवांकित इतिहास त्याग, बलिदान, शौर्य पराक्रम इत्यादी गुणांनी समृद्ध आहे.

धर्माभिमानी व्यापारी माखनशाह लभाणा यांनी १६ एप्रिल १६६४ रोजी बकाला येथे गुरु तेगबहादूर साहिब यांचा शोध लावून त्यांना शिख धमार्चे नववे गुरु म्हणून सर्वमान्यता मिळवून दिली. त्यांच्या या कृतीने गुरुभक्ती, श्रद्धा आणि निष्ठेचा असा तेजस्वी दीप प्रज्वलित केला, जो आजही शिख इतिहासात उजळत आहे.

भाई मक्खनशाह लभाणा यांचा दिल्लीतील व्यापार बाबा लाखीशाह बंजारा पाहत असत. दोघेही गुरुसेवक व श्रद्धावान बंजारा शिख होते. गुरु तेगबहादूर यांच्या शहादतीनंतर भाई लाखीशाह यांनी त्यांचे अंत्यसंस्कार करून भक्ती व धैर्य, शौर्याचा महान इतिहास घडविला.

१६ व्या शतकातील मुघल राजवटीच्या काळात हिंदू धमार्चा त्याग करून इस्लाम स्वीकारावा, अन्यथा ठार मारले जाईल असा अत्याचार सुरू झाला होता. अशा वेळी गुरु तेगबहादूर यांनी निर्भयतेने मुघल सत्तेला मी शहिद झालो तरी चालेल, पण इस्लाम धर्म कदापिही स्वीकारणार नाही आणि इतर हिंदूंचेही धर्मांतर होऊ देणार नाही, असे ठणकावून सांगितले. दरम्यान, या शहिदी समारंभ सोहळ्यास आपापले योगदान देण्याचे आवाहन सुद्धा किसन राठोड यांनी केले आहे.

# तरुण व विद्यार्थ्यांनी संतांच्या शिकवणीचा अभ्यास करावा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
राष्ट्रसंत प. पु. पाचलेगांवकर (संचारेश्वर) महाराजांच्या ११३ व्या जयंती निमित्त त्यांच्या जीवनशैलीवर आणि कार्यशैलीवर त्यांचे शिष्य अनुयायी श्रीकांत सावंत यांनी संपादीत केलेल्या विशेषांकाचे प्रकाशन नुकतेच चंचल हॉल वडाळा येथे राष्ट्रसंत दत्तानंद स्वामी यांच्या शुभ हस्ते महाराजांच्या करण्यात आले.

आजच्या संगणकिय व इंटरनेटच्या युगात तरुण मंडळी, विद्यार्थी व इतरही समाजसेवक भक्तीरसाच्या अभ्यासापासून दूर जावू लागले आहेत. त्यांनी त्यांच्या शिक्षणा बरोबर साधु संताच्या भक्तीभावाचा व शिकवणीचा अभ्यास केल्यास आपण करीत असलेले कर्म चांगल्या प्रकारे पार पडू शकते असे उद्गार प.पू. सद्गुरुदत्तानंद स्वामी यांनी मार्गदर्शन करताना काढले. यावेळी अनिल गलगली यांनी सुध्दा मार्गदर्शन केले उपस्थित शिष्य बंधु भगिनिना काही अनुभव सांगून महाराजांच्या कायार्चा गौरव केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रसंत पाचलेगांवकर (संचारेश्वर) महाराज सेवा समितीचे कार्याध्याक्ष श्रीकांत सावंत यांनी १९७० साला पासूनच्या महाराजांच्या कार्यसेवेचा मुद्देसुद आढावा घेतला.

महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन मनोभावे आरती करण्यात आली. त्यात महाराजांनी आधात्मसेवा व भक्तीसेवा कशी कशी केली तेही सदरच्या विशेषांकात प्रसिध्द करण्यात आलेली असल्याचे सांगितले. आजचा हा कार्यक्रम आणि इतरही राष्ट्रकार्य महाराज आपल्याकडून करवून घेत आहेत म्हणून या विशेषांकाची किंमत फक्त महाराजांची सेवा ही ठेवली आहे असे सावंत यांनी आपल्या प्रास्ताविकेत सांगितले.

यावेळी राष्ट्रसंत पाचलेगांवकर (संचारेश्वर) महाराज सेवा समिती मुक्तेश्वर आश्रमचे विश्वस्त जयप्रकाश ठाकुर व विठ्ठल परब, अवधूत सारंग, सुनिल देवरुखकर, दत्ताराम दळवी, रविंद्र कोतापकर, दिनेश हुमणे व संगीता गुरव आणि असंख्य गुरुशिष्य, व भाविक उपस्थित होते. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी भक्तगण उपस्थित होते.

# विनयभंगाच्या गुन्ह्याचा 24 तासांत तपास पूर्ण

## कुऱ्हा पोलिसांची तत्पर कारवाई; दोषारोपपत्र न्यायालयात दाखल

**अमरावती,( दि.10 )**- महिलेच्या विनयभंगाच्या प्रकरणात कुऱ्हा पोलिसांनी अवघ्या 24 तासांत तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करून कार्यक्षमतेचा उत्कृष्ट नमुना सादर केला आहे. ही घटना कारला परिसरात घडली होती. मिळालेल्या माहितीनुसार, 14 ऑक्टोबर 2025 रोजी फिर्यादी महिला शेतात जात असताना आरोपी महेश रामराव जाधव (वय 25, रा. कारला) याने तिला अडवून तू मला खूप आवडतेस असे म्हणत तिचा हात पकडण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने विरोध केल्यावर आरोपीने बदनामीची धमकी देत मोटारसायकलवरून तिचा पाठलाग केला. या घटनेवरून कुऱ्हा पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत कलम 74, 78, 351(2)(क्क) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ ई-साक्ष ॲपच्या माध्यमातून दोन पंचांच्या उपस्थितीत घटनास्थळ पंचनामा केला. तसेच फिर्यादी आणि साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले असता, त्यास जामीन मंजूर करण्यात आला. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक अनुप वाकडे आणि महिला पोलिस हवालदार करुणा रायबोले यांनी वेगाने पूर्ण केला. एस.डी.पी.ओ. चांदुर रेल्वे कार्यालयाच्या पडताळणीनंतर अवघ्या 24 तासांच्या आत दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

# अचलपूरमध्ये सहा, चिखलदरा मध्ये एक नामांकन दाखल

### नगर परिषद, नगर पंचायत निवडणूक

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 10 )**- तब्बल नऊ वर्षांनंतर होणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील दहा नगरपरिषद आणि दोन नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सोमवारी (दि. 10 नोव्हेंबर) नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. मात्र पहिल्याच दिवशी केवळ अचलपूर नगरपरिषदेतील सहा आणि चिखलदरा नगरपरिषदेतील एक अर्ज वगळता इतरत्र कुठेही नामांकन दाखल झाले नाही.



या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने उमेदवारांना ऑनलाइन अर्ज दाखल करण्याची सुविधाही उपलब्ध करून दिली आहे. अर्ज दाखल करताना उमेदवारास एक प्रतिनिधी सोबत ठेवण्याची मुभा असून, जिल्हा प्रशासनाने अर्ज स्वीकृतीसाठी 12 केंद्रांची व्यवस्था केली आहे. प्रत्येक केंद्रावर निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक अधिकारी आणि अतिरिक्त सहाय्यक अधिकारी अशी तीन अधिकारी पथके नेमण्यात आली आहेत. अर्ज दाखल होताच निवडणूक खर्चाचा हिशोब सुरू होणार असल्याने अनेक संभाव्य उमेदवार शेवटच्या क्षणापर्यंत थांबण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे अर्ज दाखल न होण्याचे कारण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे. अचलपूर आणि चिखलदरा वगळता इतरत्र नामांकन प्रक्रिया मंदावलेली असून पुढील काही दिवसांत उमेदवारांची हालचाल वाढण्याची शक्यता आहे.

### अचलपूरातील असे आहेत 6 नामांकन

अचलपूर नगरपरिषदेतील राजकीय रंगत सोमवारीच जाणवू लागली. शिवसेनेच्या अश्विनी लक्ष्मण मांजे आणि रेखा जियालाल गडरेल यांनी अर्ज दाखल केला. प्रहार जनशक्ती पक्षाकडून गोपाळ शेळके, काँग्रेसकडून मनीष परसराम घोडेस्वार आणि भाजपकडून अलका शशिकांत जयस्वाल यांनी अर्ज सादर केला. विशेष म्हणजे अलका जयस्वाल यांनी अपक्ष म्हणूनही एक अर्ज दाखल केला आहे. तसेच मुकेश यशवंतराव पांगारकर यांनीही अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे अचलपूरमध्ये निवडणुकीची चुरस रंगताना दिसत आहे.

### चिखलदरामध्ये अपक्ष नामांकन

चिखलदरा नगरपरिषदेतील सचिन रमेश पाटील हे एकमेव अपक्ष उमेदवार म्हणून मैदानात उतरले आहेत. मात्र मोर्शी, शेंदुरजनाघाट, वरुड, नांदगाव खंडेश्वर, धारणी, धामणगाव रेल्वे, दर्यापूर, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार आणि अंजनगाव सुर्जी येथे अद्याप कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही. त्यामुळे या ठिकाणी राजकीय वातावरण शांत असून संभाव्य उमेदवार अजूनही पक्षाचा निर्णय व स्थानिक समीकरणांच्या प्रतीक्षेत आहेत.

# बेवारस दिव्यांग दांपत्याच्या नवजात बाळावर यशस्वी शस्त्रक्रिया

### पद्मश्री शंकरबाबांचा 29 वा नातू

महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर,( दि.10 )** - अचलपूर उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी मूकबधिर आणि बेवारस दिव्यांग दांपत्याच्या नवजात बाळाचे यशस्वी शस्त्रक्रिया करून प्राण वाचवत मानवतेचा सुंदर संदेश दिला आहे. या घटनेने समाजाच्या कडेला असलेल्या व्यक्तींनाही सन्मान आणि कुटुंबाचे स्थान मिळू शकते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. या बाळाला पद्मश्री शंकरबाबांचा 29 वा नातू असे संबोधले जात आहे.



वैशाली ही मूकबधिर मुलगी मुंबईतील चेंबूर येथे पोलिसांना सापडली होती, तर अनिल हा मूकबधिर तरुण डोंगरी रिमांड होममध्ये होता. बालन्यायालयाच्या आदेशानुसार दोघांनाही अमरावती जिल्ह्यातील वझ्झर येथील अंबादासपंत वैद्य मतिमंद व मूकबधिर बेवारस बालगृहात दाखल करण्यात आले. संस्थेत वाढताना दोघांमध्ये जिव्हाळा निर्माण झाला आणि फेब्रुवारी 2019 मध्ये संस्थेच्या पुढाकाराने अमरावती येथे दोघांचा विवाह थाटात पार पडला. खासदार आनंदराव अडसूळ यांनी वधूपित्याची, तर तत्कालीन पोलिस आयुक्त बाविस्कर यांनी वरपित्याची भूमिका निभावून हा विवाह संस्मरणीय बनवला. लग्नानंतर सहा वर्षांनी वैशालीला मातृत्व लाभले. मात्र गर्भधारणेच्या अखेरच्या टप्प्यात तिची प्रकृती बिघडल्याने नागपूरला हलवण्याचा सल्ला देण्यात आला होता. मात्र अचलपूर उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी जबाबदारी स्वत:च्या हाती घेतली. डॉ. प्राजक्ता किटुकले, डॉ. आनंद सुंडे, परीचारीका गायत्री, आशा वर्कर ज्योती तायडे, वार्डन वर्षा काळे आणि सामाजिक कार्यकर्ते विनायकराव काकड यांच्या मदतीने सिझेरियन शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली. आई आणि बाळ दोघेही सुरक्षित असून, रुग्णालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेने संस्थेचे प्रमुख पद्मश्री शंकरबाबा पापळकर भारावून गेले असून त्यांनी सांगितले, आज माझ्या कुटुंबात आणखी एक देवदूत आला. हा माझा 29 वा नातू आहे. त्यांच्या या शब्दांमधून समाजातील दुर्लक्षित घटकांविषयी असलेली अपार माया आणि मानवतेवरील श्रद्धा दिसून आली.

# तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक करणारे कंटेनर जप्त

### 54 लाखांचा मुद्देमाल जप्त

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 10 )** - तंबाखूजन्य पदार्थांची अवैध वाहतुक करणार्या एका कंटेनरला कुर्हा पोलिसांनी ताब्यात घेऊन तब्बल 54 लाख 40 हजार 400 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई कुर्हा पोलिस ठाण्याच्या पथकाने 9 नोव्हेंबर 2025 रोजी केली.

गोपनीय माहितीनुसार पोलिसांना अवैध तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी कंटेनर वाहनाचा पाठलाग करून ते थांबवले. तपासणी केली असता वाहनातून विविध कंपन्यांच्या



प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा आढळून आला. अन्न व औषध प्रशासन विभागाचे निरीक्षक गजानन गोरे आणि त्यांच्या पथकाच्या उपस्थितीत पंचनामा करून विविध ब्रँडचे तंबाखू पॅकेट्स व कंटेनर ट्रक जप्त केला.

सदर प्रकरणात आरोपी उमेश भानू यादव (वय 37, रा. अर्जुन नगर, काळा पठा, बैतूल, मध्यप्रदेश) यास अटक करण्यात आली असून इतर आरोपींचा सहभाग तपासात आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी (चांदुर रेल्वे) अनिल पवार आणि पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत ठाणेदार अनुप वाकडे, पोलिस उपनिरीक्षक विलास थुल, अनिल निघोट, उमेश वाघमारे, दर्पन बनसोड, चालक सागर निमकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. कुऱ्हा पोलिस ठाण्याचे पथक पुढील तपास करीत आहे.

# जिल्ह्यातील वाळूघाट लिलावास मोठा प्रतिसाद

### 1 कोटीच्या बदल्यात सर्वोच्च 7 कोटी किंमत

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.10 )**- जिल्ह्यातील वाळूघाटांच्या ई-लिलावाला यंदा मोठा प्रतिसाद मिळाला असून, केवळ एका कोटी रुपयांच्या हातच्या किमतीवरून तब्बल सात कोटी रुपयांपर्यंत बोली लागल्याने महसूल विभागाच्या तिजोरीत भर पडणार आहे. महसूल आणि वन विभागाने वाळू निर्गती धोरणांतर्गत 2025-26 या वर्षासाठी जिल्ह्यातील 33 वाळूघाटांचा ई-निविदा व ई-लिलावाची प्रक्रिया राबविली. त्यापैकी तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या 8 वाळूघाटांचा लिलाव पूर्ण



झाला असून, या घाटांसाठी 7 कोटी रुपयांची सर्वोच्च बोली मिळाली आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे आदेश महसूल यंत्रणेला दिले आहेत. आतापर्यंत जिल्ह्यात 264 अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक प्रकरणांवर कारवाई करून दंड आकारण्यात आला आहे. याशिवाय, परराज्यातून वाळू वाहतूक पूर्णत: बंद केल्याने स्थानिक वाळूघाटांच्या लिलावास सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, शासनाच्या महसुलात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, उर्वरित 25 वाळूघाटांच्या लिलावाची दुसरी फेरी mahatender.gov.in या संकेतस्थळावर सुरू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया 10 नोव्हेंबर ते 20 नोव्हेंबर 2025 या कालावधीत राबविण्यात येणार आहे. इच्छुक लिलावदारांना 17 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची संधी असेल. तर 20 नोव्हेंबर रोजी सकाळी 10 वाजल्यापासून ऑनलाईन लिलावाची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू होईल.जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगितले की, वाळू लिलाव ही पारदर्शक व महसूल वृद्धी करणारी प्रक्रिया असून, इच्छुकांनी कायदेशीर मार्गाने सहभाग घ्यावा. जिल्ह्यातील वाळू उपलब्धतेचा योग्य उपयोग शेतकरी व बांधकाम क्षेत्राच्या हितासाठी होईल, याची दक्षता प्रशासन घेणार आहे.

# पोक्सो अंतर्गत 5 वर्षांची सक्तमजुरी

**अमरावती,( दि.10 )** - अल्पवयीन मुलींशी अश्लील वर्तन करणाऱ्या एका विकृत आरोपीला जिल्हा व सत्र न्यायाधीश (3) यशवंत ए. गोस्वामी यांच्या न्यायालयाने पाच वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. ही घटना 2020 साली खोलापुरी गेट परिसरात घडली होती. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी संदीप हिरापुरे (रा. अमरावती) याने पीडित मुलीला सायकलवरून घरी जात असताना रिंग रोडवरील सातपुते वाडीजवळ अडवून अर्धनग्न अवस्थेत अश्लील हावभाव केले. त्यानंतर मुलीला शेताकडे ओढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पीडिता आरडाओरडा करू लागल्याने नागरिकांनी तिची सुटका केली. घटनेनंतर पीडितेने खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. तपासात समोर आले की आरोपी परिसरातील कॉलेज मुलींना वारंवार छेडत असे. गुन्हा सिद्ध झाल्यानंतर सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील ॲड. सोनाली क्षिरसागर यांनी एकूण 10 साक्षीदार तपासले. न्यायालयाने आरोपीविरुद्ध पोक्सो कलम 8 अंतर्गत 5 वर्षांची सक्तमजुरी व 20,000 रुपये दंड, पोक्सो कलम 12 अंतर्गत 2 वर्षांची सक्तमजुरी व 2,000 दंड, तर भा.दं.वि. कलम 341 अंतर्गत 1 महिन्याची साधी कैद व 500 रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. आरोपीला सर्व शिक्षा एकत्र भोगावयाच्या आहेत. तसेच पीडित मुलीस विधी सेवा प्राधिकरणामार्फत नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.



जिल्हा न्यायालयाचा कठोर निर्णय

# मानसिक छळाला कंटाळून शासकीय कर्मचाऱ्याची आत्महत्या

### वडाळगव्हाण येथे गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली ◆ चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**दर्यापूर,( दि.10 )** - प्रेमसंबंधातून सुरू झालेल्या वाद, पैशांची मागणी आणि सततच्या ब्लॅकमेलिंगमुळे मानसिक छळ सहन न झाल्याने एका शासकीय कर्मचाऱ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना दर्यापूर तालुक्यातील वडाळगव्हाण येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी एका महिलेसह चौघांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शनिवारी (दि. 8 नोव्हेंबर) रात्री सुमारे 11.30 वाजताच्या सुमारास ही घटना घडली. रविवारी उशिरा रात्री हा प्रकार उघडकीस आला. वडाळगव्हाण येथील 62 वर्षीय



महिलेच्या फिर्यादीवरून रहिमापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृतक व्यक्ती धुळे येथील भुजल सर्वेक्षण विभागात कार्यरत होते. कामाच्या ठिकाणी असताना त्यांचे एका महिलेसोबत प्रेमसंबंध प्रस्थापित झाले होते. मात्र, काही कारणांमुळे त्यांच्यात वाद निर्माण झाले.

त्यानंतर संबंधित महिलेकडून वारंवार पैशांची मागणी आणि ब्लॅकमेलिंग सुरू झाली. दरम्यान, बी. जी. महाजन, सचिन हरणे आणि रुपेश पाटील (रा. देवपूर, धुळे) यांनीही त्या कर्मचाऱ्याला मानसिक त्रास देत दबाव आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सर्व छळाला कंटाळून त्यांनी वडाळगव्हाण येथे गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेनंतर रहिमापूर पोलिसांनी एका महिलेसह बी. जी. महाजन, सचिन हरणे आणि रुपेश पाटील या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# कृषी पंपाच्या वेळापत्रकात बदल करा!

### महावितरण कार्यालयावर शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि. 10 )** - रब्बी हंगामाच्या सुरुवातीलाच महावितरण कंपनीने शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या विजेच्या वेळापत्रकात बदल केल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रात्रीचा वीजपुरवठा त्रासदायक ठरत असून, शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी रात्रीच्या अंधारात जीव धोक्यात घालून शेती करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर पिंपळखुटा जिल्हा परिषद सर्कलमधील शेकडो शेतकऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस हितेश साबळे यांच्या नेतृत्वात महावितरण कार्यालयावर धडक देत ठिय्या आंदोलन छेडले.

शेतकऱ्यांनी रात्री नव्हे, दिवसा वीज द्या! असा घोष देत कृषी पंपाचे वेळापत्रक तात्काळ बदलण्याची मागणी केली. तसेच, ट्रान्सफॉर्मरमधील वारंवार होणारे बिघाड, सिंगल फेज वीजपुरवठा, तुटलेल्या तारांमुळे होणारा त्रास यासारख्या समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.पिंपळखुटा सर्कल अंतर्गत येणाऱ्या निंभी व राजवाडी केंद्रातील सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी ठामपणे करण्यात आली. आंदोलनात हितेश साबळे, प्रशांत बुरंगे, हितेश उंदरे, ओम ढाकुलकर, आकाश साबळे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांनी इशारा दिला की, मागण्या न मानल्यास सोमवार, दि. 17 रोजी मोर्शी विभागीय कार्यालयात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनामुळे प्रशासन व महावितरण विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे.

# नगरपालिकेत कर भरण्यासाठी इच्छुक उमेदवारांची गर्दी

### पालिकेच्या गंगाजळीत अपेक्षित वाढ

**प्रविण बोके**

**अंजनगाव सुर्जी,( दि.10 )** - नगरपरिषद निवडणुकीच्या कार्यक्रमाला आजपासून सुरुवात झाली असून, इच्छुक उमेदवारांनी नगरपरिषदेचा कर भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. वर्षभर कर वसुलीसाठी घराघरांत फिरणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रतिसाद मिळत नसला, तरी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर कार्यालयात नागरिकांची अक्षरश: झुंबड उडाली होती.



निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार उमेदवाराकडे कोणतीही थकबाकी नसणे आवश्यक आहे. उमेदवारी अर्ज स्वीकारला जाण्यासाठी संबंधित प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक असल्याने उमेदवार आणि त्यांचे समर्थक कर भरण्यासाठी नगरपरिषदेच्या कार्यालयात धाव घेत आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे थकीत असलेली कररक्कम आता पालिकेच्या तिजोरीत जमा होणार आहे. नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना ही परिस्थिती सोन्याची संधी ठरत असून, महसूल वाढीला गती मिळेल अशी अपेक्षा आहे. इच्छुक उमेदवारांकडून कर भरण्यासाठी ऑनलाईन सुविधा आणि विशेष काउंटर सुरू करण्याची मागणीही पुढे येत आहे.

### पहिल्या दिवशी उमेदवारी नामांकन नाही

स्थानिक नागरिकांमध्ये चर्चा आहे की, उमेदवारांच्या पात्रतेच्या धडपडीमुळे निर्माण झालेली ही 'करभरणा लाट' केवळ निवडणुकीपुरती मर्यादित नसून, नगरपरिषदेच्या आर्थिक आरोग्यासाठीही सकारात्मक ठरणारी आहे. आज दि. 10 नोव्हेंबर हा उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा पहिलाच दिवस असून, उत्साह दिसत असतानाही नगराध्यक्ष किंवा नगरसेवक पदासाठी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही. मात्र, कर भरण्याच्या वाढत्या गर्दीमुळे पालिकेच्या गंगाजळीत मोठी वाढ होणार हे निश्चित झाले आहे.

# अमरावतीत ओडिशाहून आणलेला गांजाचा साठा जप्त

### तळेगाव दशासर येथे पोलिसांची कारवाई; दोन किलोहून अधिक माल जप्त

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 10 )**- ओडिशा राज्यातून अमरावती जिल्ह्यात गांजाची तस्करी करणाऱ्या एका इसमाला ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने तळेगाव दशासर सीमेजवळील गस्तीदरम्यान रंगेहात पकडले. या कारवाईत पोलिसांनी तब्बल 2.10 किलो गांजा आणि अंदाजे 40 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रविवारी रात्री गस्तीदरम्यान पोलिसांना एक संशयित इसम दिसला. त्याला थांबवून विचारपूस केली असता तो अडखळत बोलू लागला. त्याच्याकडील कॉलेज बॅगची तपासणी केली असता, आत गांजाचे पॅकेट आढळून आले. पुढील चौकशीत आरोपीने हा गांजा ओडिशातून छत्तीसगडमार्गे



अमरावतीत विक्रीसाठी आणला होता, अशी कबुली दिली.

संशयिताचे नाव गणेश माणिकराव गणवीर (वय 35, रा. सुलतानपूर, ओडिशा) असे असून, त्याच्यावर अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे आणि त्यांच्या पथकाने केली. या घटनेनंतर ग्रामीण भागात अवैध अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात पोलिसांनी अधिक सतर्कता वाढवली आहे.

# शिक्षण : व्यक्तिमत्त्व, समाज आणि राष्ट्र घडविण्याची परिवर्तनशील प्रक्रिया

शिक्षण हा मानवी जीवनाचा मूलाधार आहे. मनुष्य जन्मतः केवळ ह्यजैविक अस्तित्वह्ण घेऊन येतो, परंतु शिक्षणामुळे तो ह्यमानवह्ण होतो. विचार करणे, निर्णय घेणे, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखणे, मूल्ये अंगीकारणे, समाजात सुसंवाद राखणे, प्रगतीकडे वाटचाल करणे या सर्व गोष्टी शिक्षणातून घडतात. म्हणूनच शिक्षणाला जीवनाचा प्राणवायू म्हणणे सयुक्तिक ठरेल.

----------------

११ नोव्हेंबर हा राष्ट्रीय शिक्षण दिन भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण देशभर साजरा केला जातो. मौलाना आझाद यांनी शिक्षणाला केवळ रोजगाराचे साधन मानले नाही, तर त्यांनी शिक्षणाला राष्ट्रनिर्मितीचे साधन, सामाजिक परिवर्तनाचे माध्यम आणि मानवतेचे संवर्धन करणारा आधारस्तंभ मानले.

त्यांचा स्पष्ट विश्वास होता की शिक्षण हे सर्वांसाठी समानरित्या उपलब्ध झाले तरच समाजात खरी समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित होईल. म्हणूनच आजच्या काळात शिक्षणाच्या अथार्चे, उपयोगाचे आणि गरजेचे नव्याने पुनर्मूल्यांकन करणे ही काळाची गरज आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास समाज हा माणसांच्या परस्पर संबंधांचे, विचारांचे, संस्कृतीचे, अधिकारांचे आणि संस्थांचे गुंफण आहे. या संपूर्ण सामाजिक संरचनेचे मुख्य नियंत्रण शिक्षण करत असते.

शिक्षण समाजात नवे विचार आणते, जुन्या परंपरांचे चिकित्सक पुनर्विलोकन करते, बदल स्वीकारण्याची प्रेरणा देते आणि समाजाला प्रगत दिशेने पुढे नेत राहते. शिक्षण हे फक्त ज्ञान देणे नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची सर्जनशील प्रक्रिया आहे. समाज जसा बदलत जातो तसाच शिक्षणाचा आविष्कारही बदलत जातो.

कालपरत्वे शिकविण्याच्या पद्धती, विषय, उद्दिष्टे, साधने, शिक्षक-विद्यार्थी नाते यांच्या स्वरूपात बदल होत गेले आहेत; परंतु शिक्षणाचा मुख्य हेतू आजही तोच आहे. माणसाला जगण्याची कला शिकविणे आणि समाज अधिक मानवी, न्याय्य व प्रगतिशील करणे.

भारतीय समाजाची ऐतिहासिक रचना पाहता शिक्षण नेहमीच सामाजिक स्तरांच्या आधारे नियंत्रित राहिले. प्राचीन काळातील गुरुकुल पद्धतीत ज्ञानाची देवाणघेवाण होत असली तरी सर्वांना समान संधी उपलब्ध नव्हती. काही विशिष्ट वर्णांना ज्ञान मिळण्याचा अधिकार होता, तर इतरांना ज्ञानापासून दूर ठेवण्यात आले. ज्ञानाचे हे केंद्रीकरण समाजातील असमानता वाढविणारे ठरले.

मध्ययुगीन काळातही धार्मिक संस्था, राजकीय सत्ता आणि सामाजिक रूढी यांच्या आधारे ज्ञानाची मर्यादा घातली गेली. ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाची सुरुवात झाली, तर्कशास्त्रीय आणि वैज्ञानिक विचारांची जागृती झाली, पण त्याचा उद्देश भारतीय समाजाला ज्ञानसमृद्ध करणे नसून प्रशासनासाठी प्रशिक्षित कर्मचारी मिळवणे हा होता.

स्वतंत्र भारताने मात्र शिक्षणाला समाजाच्या केंद्रस्थानी ठेवले. भारतीय संविधानाने शिक्षणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा दिला. समानता आणि समावेशकता हे शिक्षणाचे मार्गदर्शक तत्व म्हणून ठरविले. परंतु आजही शहर व ग्रामीण भाग, आर्थिक स्तर, लिंग, जाती, प्रदेश, आदिवासी आणि दुर्बल गटांमध्ये शिक्षणाच्या संधींत प्रचंड अंतर आहे.

आज शिक्षणाच्या क्षेत्रात दिसणारी सर्वात मोठी असमानता म्हणजे गुणवत्तेतील तफावत. मोठ्या शहरांतील कॉर्पोरेट शाळा आधुनिक साधनांनी सुसज्ज आहेत, तर अनेक ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता, प्रयोगशाळा-अभाव, डिजिटल सुविधांची मर्यादा, मुलींसाठी सुरक्षा आणि वाहतूक यांसारखी मूलभूत समस्या कायम आहेत.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२

ज्या मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळते ते समाजात पुढे जातात; तर जे शिक्षणापासून वंचित राहतात ते मागे पडतात. अशा वेळी शिक्षण सामाजिक गतिशीलता थांबविण्याचे साधन ठरते, आणि समाजात नवीन असमानता अधिक स्पष्ट होत जाते. म्हणूनच शिक्षणाचा प्रसार करताना केवळ शाळांची संख्या वाढवणे पुरेसे नाही, तर शिक्षणाची गुणवत्ता, पोहोच, सुरक्षितता, समतोल निधी, प्रशिक्षित शिक्षक आणि प्रगत अभ्यासक्रम हे मुद्दे अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

शिक्षणाचा खरा उद्देश समाजात विवेकपूर्ण नागरिक घडविणे हा आहे. केवळ पदव्या मिळविणे म्हणजे शिक्षित होणे नाही. शिकलेला मनुष्य तर्क करतो, विश्लेषण करतो, समस्या समजून त्यावर उपाय शोधतो, भेदभावाला प्रश्न विचारतो, अंधश्रद्धेला आव्हान देतो आणि न्याय्य समाजाच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घेतो.

लोकशाही राष्ट्रासाठी सजग नागरिकांची निर्मिती ही शिक्षणाची सर्वात मोठी देणगी आहे. केवळ मतदान करणे किंवा कायदे माहित असणे म्हणजे नागरिकत्व नाही; तर समाजाच्या भल्यासाठी विचारपूर्वक कृती करणे, सामाजिक समरसता राखणे आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळ देणे हा खरा नागरिकत्वाचा अर्थ आहे. शिक्षण व्यक्तीला ही समग्र जबाबदारीची जाणीव करून देते.

शिक्षणाशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. आजचे युग ज्ञानाधारीत अर्थव्यवस्थेचे आहे. देशात उद्योग, तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य, विज्ञान, संशोधन, व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांत कुशल मनुष्यबळाची गरज आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण हे रोजगारक्षमतेचे आणि रोजगारनिर्मितीचे मूळ आहे.

देशाचा विकासदर, उत्पादनक्षमता आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता ही थेट शिक्षणाच्या पातळीवर अवलंबून असते. नवीन शिक्षण धोरण २०२० मध्ये कौशल्याधारित शिक्षण, बहुविद्याशाखीय शिक्षण, डिजिटल साक्षरता, संशोधन आणि नवोन्मेष यांना मिळालेला भर महत्त्वाचा आहे. मात्र, धोरणे तेव्हाच परिणामकारक ठरतात जेव्हा त्यांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे, योजनेनुसार आणि सर्वसमावेशक दृष्टीकोनातून केली जाते.

शिक्षणात शिक्षकाची भूमिका केंद्रस्थानी आहे. शिक्षक म्हणजे ज्ञान देणारा, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे तो मूल्यांची संस्कृती रुजविणारा. शिक्षक विद्यार्थ्यांच्या अंतर्मनातील प्रतिभा ओळखून तिला योग्य दिशा देतो.

शिक्षण यशस्वी होण्यासाठी शिक्षक-विद्यार्थी संबंध विश्वास, आदर आणि सर्जनशील संवाद यांवर आधारित असणे आवश्यक आहे. आज तंत्रज्ञान शिक्षणात महत्त्वाची भूमिका निभावत आहे. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल साधने, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित पद्धती आल्या आहेत, परंतु मानवी भावनिक स्पर्श, प्रेरणा, सहानुभूती आणि संस्कार ही कामे शिक्षकच करू शकतो.

शिक्षक हा केवळ शाळेत शिकवणारा नसून, तो समाजाचा घडवणारा शिल्पकार आहे, हे विसरून चालणार नाही.

स्त्री शिक्षण हा समाज परिवर्तनाचा महत्त्वाचा भाग आहे. स्त्री शिक्षित झाली तर कुटुंब शिक्षित होते, पुढची पिढी जागरूक होते, समाज प्रगत होतो. मुलींना माध्यमिक आणि उच्च शिक्षण मिळण्यात आजही ग्रामीण भागात अडथळे आहेत. सामाजिक अडथळे, लिंगभेद, पायाभूत सुविधांचा अभाव, लवकर लग्नाची प्रथा, सुरक्षिततेची चिंता हे प्रश्न दूर केल्याशिवाय समता ही कल्पना केवळ घोषणेतच राहील. त्यामुळे मुलींना शिक्षण देण्याचे कार्य हे केवळ शासकीय धोरण नसून संपूर्ण समाजाने स्वीकारलेली मूल्यबद्ध जबाबदारी असणे आवश्यक आहे.

शिक्षणाचा आणखी एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे मूल्यशिक्षण होय. आज जग झपाट्याने बदलत आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाने सुविधा वाढल्या आहेत, पण माणसामधील भावनिक अंतरही वाढले आहे. स्वार्थ, स्पर्धा, सामाजिक तणाव, धार्मिक वैमनस्य, हिंसा आणि असहिष्णुता समाजात चिंतेचे विषय बनत आहेत. अशा वेळी शिक्षणाने फक्त ज्ञान न देता मानवी मूल्ये पेरणे अत्यावश्यक आहे. सहजीवन, परस्पर आदर, करुणा, जबाबदारी, सहिष्णुता, संवेदनशीलता ही मूल्ये शिकवणारे शिक्षण राष्ट्राला स्थिर, मजबूत आणि सुदृढ बनवते.

राष्ट्रीय शिक्षण दिन हा केवळ एका नेत्याची जयंती नाही. तो शिक्षणाच्या मूल्यांचा पुनःस्मरणाचा, समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचविण्याच्या संकल्पाचा दिवस आहे.

हा दिवस आपल्याला सांगतो की शिक्षणात असमानता राहिली, तर समाजातही समता निर्माण होऊ शकत नाही. शिक्षण सर्वांना समानरित्या उपलब्ध झाले, गुणवत्तापूर्ण झाले, मूल्याधारित झाले आणि सर्वसमावेशक झाले तर समाज आपोआप न्याय्य, सुसंस्कृत आणि प्रगतिशील बनेल.

म्हणून आजच्या राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने आपण हे स्पष्टपणे ठरवूया की शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे साधन नाही, ते जीवन घडविण्याची कला आहे. शिक्षण हे केवळ स्पर्धेसाठी नाही, ते समानतेसाठी आहे. शिक्षण हे केवळ व्यक्तीला उंचावण्यासाठी नाही, ते समाज आणि राष्ट्र उंचावण्यासाठी आहे.

म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जी कुणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. तसेच मौलाना अबुल कलाम आझाद यांनी म्हटले होते की शाळा बंद पडली तर राष्ट्र बांधणे थांबते. म्हणून शिक्षणाचा दिवा फक्त प्रज्वलित करायचा नाही, तर सतत तेजस्वी ठेवायचा आहे. कारण शिक्षण हे भविष्य घडवते, आणि घडवलेले भविष्यच राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करते.

------------

(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# ...म्हणजेच भ्रष्टाचाराला खतपाणी घालणे!

वादग्रस्त व्यवहार रद्द करून भ्रष्टाचार लपणार आहे काय? भ्रष्टाचार अंगलट येताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपला पवित्रा बदलविला आणि पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया एंटरप्राईजेस एलएलपी कंपनीने खरेदी केलेल्या पुण्यातील मुंढवा - कोरेगाव पार्क येथील ४० एकर महार वतन जमिनीचा वादग्रस्त व्यवहार अखेर रद्द करण्यात आला आहे. हा व्यवहार रद्द केला याचे स्वागतच,परंतु पार्थ पवारवर ताबडतोब कठोर कारवाई का नाही?

व्यवहार रद्द म्हणजे पार्थ पवार यांना क्लीन चिट हे सिद्ध झाले आहे. ही कसली समाज सेवा आणि हे कसले लोकप्रतिनिधी? सर्वसाधारण गुन्हेगारांनी थोडा गुन्हा केला तर त्याला जेलमध्ये डांबून ठेवतात आणि १८०० कोटीची जमिन ३०० कोटीमध्ये घेणारा पार्थ पवार, त्यांच्यावर काहीही कारवाई न करता त्यांचे वडील झालेला व्यवहार रद्द करतात. म्हणजेच राज्यात असलेल्या सरकारमधील राजकीय पुढारी राज्याला आपली स्वतःची मालमत्ता समजतात की काय? हा कसला न्याय?

अजित पवारांनी पुर्वी सिंचन घोटाळा केला होता, आता पार्थचा घोटाळा. अजित पवार विरोधात असतांना ७० हजार कोटींचा सिंचन घोटाळा उघडकीस आला होता. परंतु सत्तेत येताच त्यांचे संपूर्ण घोटाळे निरर्थक ठरले व त्यांना क्लिनचीट मिळाली. तसेच पार्थ पवारांचे सुध्दा होईल. त्यांच्या केसालाही धक्का लागणार नाही. यात सरकारी अधिकारी, कर्मचारी किंवा कंपनीच्या विरोधात मात्र गुन्हे दाखल करून कारवाई केली जाईल.

गेल्या विस वर्षाच्या काळात राज्यासह देशातील ९५ टक्के आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचाराच्या संपूर्ण सीमा पार केल्या, अरबोंची संपत्ती जमा केली. अशानी खरोखरच राज्याचा किंवा देशाचा विकास होईल का? शेतकऱ्यांकडे सरकारचे व राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष जाईल का? भ्रष्टाचारामध्ये सर्वच राजकीय पक्षांचे ९५ टक्के राजकीय पुढारी पुर्णतः लिप्त आहेत. तरीही राजकीय पुढाऱ्यांवर कोणतीही कठोर कारवाई किंवा शिक्षा अजीबात होतांना दिसत नाही.

पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील सुमारे ४० एकर जमीन "अमोडिया एंटरप्राईजेस"या कंपनीला विकण्यात आली होती.या कंपनीच्या नोंदणीपत्रात भागीदार म्हणून पार्थ पवार यांचा स्पष्ट उल्लेख आहे. महार वतनाची ही जमीन विकण्यास मनाई आहे.तरीही हा व्यवहार पुढे रेटण्यात आला. बाजारभावानुसार जमिनीची किंमत तब्बल १८०० कोटी रुपये असतांना खरेदी व्यवहार फक्त ३०० कोटीत करण्यात आला. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयाची फसवणूक झाल्याचा आरोप आहे.

या कोट्यवधींच्या व्यवहारासाठी केवळ ५०० रुपए मुद्रांक वसूल करण्यात आले. हे सगळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुत्रासाठी अवघ्या एका महिन्यात घडवून आणल्याचे सांगितले जाते. महार वतन म्हणजे ब्रिटिश काळात महार समाजाला शासनाची सेवा करण्याच्या बदल्यात वंशपरंपरागत पध्दतीने कसण्यासाठी दिलेली जमीन. या जमिनीवर वतनदारांचे हक्क आहेत.ही जमीन वतनदारांना कसता येते. पण खरेदी-विक्री किंवा हस्तांतरण करता येत नाही. परंतु पार्थ पवार सारखे राजकीय पुढारी यांच्याजवळ कोट्यवधींची संपत्ती असून सुद्धा भ्रष्टाचार करून १८०० कोटी रुपयांची जमीन फक्त ३०० कोटी रुपयात घेण्याचा व्यवहार करतात, अशांना तर सरकारने लोकप्रतिनिधी पदावरून ताबडतोब बरखास्त करायला पाहिजे व आजीवन कारावास अशी कठोर सजा व्हायला हवी. तेंव्हाच राजकीय पुढाऱ्यांमध्ये बदल घडवून येईल. अन्यथा भ्रष्टाचार दिवसेंदिवस वाढतच जाईल.

राज्यासह देशात आपण रोज "वोट चोरीच्या"बातम्या मिडियाच्या माध्यमातून ऐकत असतो. आता "जमिन चोरी" सुध्दा सुरू झाल्याचे दिसून येते. यावरून स्पष्ट होते की ९५ टक्के राजकीय पुढारी वाममार्गाने अब्जाधिश बनतात. या राजकीय पुढाऱ्यांच्या चोऱ्यांमुळे सामान्य जनतेला योग्य आरोग्य सुविधा उपलब्ध होत नाही, शेतकऱ्यांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहे, बेरोजगारांची समस्या वाढत आहे, महागाई वाढत आहे.

शाळा-महाविद्यालये, कारखाने,शेत जमीन इत्यादीसह अनेक व्यवहार राजकीय पुढाऱ्यांचे आहेत. पुढाऱ्यांनी खरोखरच इमानदारी दाखविली असती तर राज्यात मोठे उद्योग उभारू शकते, शेतकऱ्यांचे कर्ज माफ होवू शकते, गरीब व सर्वसामान्यांना चांगल्याप्रकारची आरोग्य सुविधा उपलब्ध करून देता आली असती, बेरोजगारांना रोजगार मिळू शकला असता. परंतु या राजकीय पुढाऱ्यांनी देशाचे वाटोळे केले आहे.

राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी स्वाहाकाराची भावना जोपासली व राज्यात नवीन समस्या निर्माण केल्या. असलाच प्रकार पार्थ पवार यांनी केला ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. सरकारने कथीत भ्रष्टाचारावर पांघरूण घालण्यासाठी पाच सदस्यांची चौकशी समिती स्थापन केली आहे. परंतु, कोणतीही समिती असो ती सरकारच्या बाजूने असते व प्रकरण दाबण्यासाठी दिखावा असतो. त्यामुळे समिती ही फक्त ढोंग आहे. न्याय द्यायचाच असेल तर पार्थ पवारांवर कठोर कारवाई करावी.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

■ ■ ■

# आयुष्याची फाईल, भावनांचे व्हायरस आणि जगण्याचा रिस्टार्ट..!

डिजिटल माणसाचं भावनिक हँग होणं, आजचा माणूस डिजिटल जगात सर्वाधिक कनेक्टेड आहे, पण भावनिकदृष्ट्या सर्वाधिक डिस्कनेक्टेड.स्मार्टफोन हातात असला तरी, मनाचं नेटवर्क वारंवार नो सिग्नल दाखवतं.

बाहेरून तो स्मार्ट, स्टायलिश आणि अपडेटेड दिसतो, पण आतून त्याचं मन मंदावलेलं, थकलंलेलं, हँग झालेलं असतं. असं का? कारण आयुष्याच्या फोल्डरमध्ये नकोशा फाईल्स साचल्या आहेत. तक्रारी, कटुता, ईर्षा, अपयशाच्या आठवणी, तुटलेल्या नात्यांचे स्क्रीनशॉट्स.

या सगळ्या फाईल्सचा भार मनाच्या रॅमवर पडतो आणि आत्म्याची सिस्टीम संथ होते.माणूस स्वतःचा यूजर राहिलेला नाही, तर स्वतःच्या विचारांचा बळी झालेला आहे.अशा वेळी आवश्यक असतं मनाचा क्लीनअप आणि जीवनाचा रिस्टार्ट! कर्म नियतीच्या सर्व्हरवरील खरी ओळख कुणी बघत नाही. म्हणून मनाप्रमाणे वागावं हा विचार मोहक आहे, पण त्यात विनाश लपलेला आहे.

कारण नियतीचा सर्व्हर नेहमी ऑन असतो. ती प्रत्येक कर्माचा डेटा सेव्ह करते. त्या सर्व्हरवर कोणतंही लॉगआउट नाही. माणूस कितीही बाहेरून परिपूर्ण दिसला तरी त्याच्या कर्मांची हिस्टरी मिटत नाही. तीच त्याचं ओळखपत्र असते.

नियतीचं गणित चुकत नाही ती ना रागावते, ना माफ करते, फक्त बिल पाठवते आणि मग आयुष्याच्या स्क्रीनवर Update Required" असा संदेश दिसतो. तो संकेत असतो स्वतःचा सॉफ्टवेअर अपडेट करण्याचा!

कर्म हेच खरी ओळख. बाकी सर्व काही तात्पुरती फाईल्स आहेत. शब्दांचे बाण आणि आत्मकवच कधी कुणाच्या शब्दांनी मन थरथरतं. कधी एखाद्या कटू वाक्याने आत्मा दुखावतो.

आपण म्हणतो त्याने माझं मन तोडलं. पण खरं पाहता, आपल्या आत्मकवचात क्रॅक पडलेला असतो. जो स्वतःबद्दल दृढ असतो, त्याला बाहेरचं कुणी तोडू शकत नाही. कुणी काय म्हणालं यापेक्षा आपण स्वतःबद्दल काय विचार करतो हेच निर्णायक असतं. स्वतःचं जीवन सजवा, त्यात प्रसन्नता जोडा.

कौतुक करणारे तुमच्या प्रकाशात न्हाऊन जातील, तर जळणारे त्याच प्रकाशात सावली शोधतील. त्यांच्या तापमानाने तुमचं ऊन मोजू नका. तुमची उर्जा तुमच्याच सकारात्मकतेत आहे. मनाच्या मेमरीचा क्लीनअप मोड जेव्हा फोन स्लो होतो, तेव्हा आपण कॅशे क्लिअर करतो, अनवाँटेड अहप्स डिलीट करतो, गॅलरीतील नकोसे फोटो काढून टाकतो. हे सगळं करून फोन झपाट्याने चालू लागतो.पण जेव्हा मन हळूहळू जड होतं, विचार हँग होतात, दुःखाचे पॉपअप्स वारंवार झळकतात, तेव्हा आपण काय करतो?



गजानन कुसुम ओंकार हरणे
जिल्हा परिषद नगर,
खडकी, अकोला.
9822942623

जुन्या जखमा पुन्हा उघडतो, जुन्या आठवणी पुन्हा रिवाइंड करतो,आणि स्वतःलाच त्रास देतो.मनात साचलेल्या नकारात्मक फाईल्स अपराधभाव, ईर्षा, अपयश, नकोसे लोक, अकारण ताण या सगळ्यांचा क्लीनअप केला पाहिजे. जे तुम्हाला ताप देतात, त्यांना मनातून डिलीट करा. जे दुःख देतात, त्यांना रिसायकल बिनमध्ये टाका. मन रिकामं झालं की, शांतीचं अहप पुन्हा कार्यरत होतं आणि माणूस पुन्हा रिस्टार्ट होतो. रिफ्रेश म्हणजे विसरणं नाही, समजून पुढे जाणं.

काहीजण सांगतात विसरून जा, पुढे चल. पण विसरणं तात्पुरतं असतं; पुन्हा स्मृती येतात आणि दुखावत जातात. त्याऐवजी समजून घेणं आणि मुक्त होणं हेच खरं डिलीट करणं आहे.जसं ॲप पूर्ण अनइन्स्टॉल केलं की त्याचं काही शिलक राहत नाही, तसंच एखादं दुःख मनातून समजून घेतल्यावर त्याचं अस्तित्व संपतं. त्याच वेळी माणूस नवा होतो.

त्याच्या विचारांमध्ये, चेहऱ्यावर आणि कृतीत प्रसन्नतेचा प्रकाश झळकतो. मुक्तता ही विस्मरणातून नाही, तर समजुतीतून जन्म घेते. सतत अपग्रेड होत राहा

आज जगाच्या वेगात राहण्यासाठी तांत्रिक अपडेट्स आवश्यक आहेत. पण भावनिक, वैचारिक, सामाजिक अपडेट्सही तितकेच गरजेचे आहेत. मनाची ऑपरेटिंग सिस्टीम जुनी झाली की विचारही बग्स निर्माण करतात. त्यातून राग, अहंकार, मत्सर आणि कटुता या एरर मेसेजेस जन्म घेतात. म्हणून मन सतत अपडेट ठेवा.

नवीन विचार डाउनलोड करा, जुन्या पूर्वग्रहांना अनइन्स्टॉल करा, सकारात्मकता आणि प्रसन्नतेचं ॲप चालू ठेवा.

जो माणूस स्वतःला वेळोवेळी सुधारतो, तोच खऱ्या अर्थाने लाइफचा अपडेटेड व्हर्जन बनतो. आयुष्य जिथे थांबतं, तिथे दुःख सुरू होतं आणि जिथे नवं शिकणं चालू राहतं, तिथे आनंद आपोआप मिळतो.

सजगतेचं अँटीव्हायरस जगात चांगुलपणा संपलाय असं म्हणणारे लोक स्वतःकडे पाहायला विसरले आहेत. कारण चांगुलपणाची सुरुवात बाहेरून होत नाही, ती आतून होते. माणूस सजग असेल, तर तो वाईट काळातही प्रकाश शोधतो. सजगता म्हणजे मनावर नियंत्रण.

शब्दांचा वापर शस्त्रासारखा नाही, तर औषधासारखा करा. कटुतेला प्रत्युत्तर न देता शांत राहणं ही कमजोरी नाही, ती उच्च बुद्धी आहे. मनातील शांतता हीच सर्वात प्रभावी अँटीव्हायरस सिस्टीम आहे. ती नकारात्मक विचारांच्या व्हायरसपासून आपल्याला वाचवते, आणि आत्म्याच्या प्रोसेसिंग स्पीडला स्थैर्य देते. स्वतःचा तांत्रिक तज्ज्ञ बना.

जेव्हा मन थकतं, तेव्हा शब्द ओले होतात.जेव्हा मन रडतं, तेव्हा आठवणींचा डेटा फोडून पडतो. पण हाच क्षण माणसाच्या अंतर्मनातील तंत्रज्ञाला जागवतो.

तो स्वतःलाच म्हणतो Clear History. Start Fresh." हे तीन शब्द म्हणजे आत्मोद्धाराचं सूत्र आहे. कारण कोणी दुसरं तुमचं आयुष्य रिस्टार्ट करू शकत नाही तो बटण तुमच्याच हातात आहे.स्वतःचा तांत्रिक तज्ज्ञ बना.मन थकले की रिबूट करा, आशा संपली की रिफ्रेश करा, आणि जिथे गरज वाटेल तिथे अपडेट करा.

जीवनाची सिस्टीम पुन्हा चालू होईल. पुन्हा एकदा 'Live Mode ON' करा. आजचा काळ वेगवान आहे, पण माणूस भावनिकदृष्ट्या मंदावला आहे. त्याने नात्यांना, विचारांना, भावनांना जास्त डेटा दिला आणि आत्म्याला कमी स्पेस ठेवली. म्हणून आयुष्याची मेमरी स्वच्छ करा. नको ती माणसं, नको त्या भावना, नको त्या सल सगळं डिलीट करा. पुन्हा एकदा 'Live Mode' ऑन करा. कारण नव्या सुरुवातीसाठी जुनं मिटवणं आवश्यक असतं.

भूतकाळाच्या व्हायरसने वर्तमानाला संक्रमित होऊ देऊ नका. जीवन सुंदर आहे, पण त्यासाठी तुम्हाला स्वतःचं सिस्टम मेंटेनन्स करावं लागेल. कारण तुम्हीच तुमच्या आयुष्याचे ॲडमिन आहात आणि आयुष्य हीच सर्वात सुंदर, सर्वात मौल्यवान ॲप्लिकेशन आहे. तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार, खुद बदलो जग बदलेगा.

*तुझं आहे तुझंपाशी*
*पण तू ते विसरलाशी....*

आपल्या जीवनात आपण स्वतः परिवर्तन करू शकतो दुसरा कोणीही करू शकत नाही. हे जाने जाणलं तोच जीवनात परिवर्तन करू शकतो . पुढे जाऊ शकतो. यशस्वी होऊ शकतो. जय जगत...!

## निवडणूक व्यवस्थेत निष्पक्षता आणि पारदर्शकता म्हणजेच बळकट लोकशाही

वाचक लिहितात

लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या निवडणूक प्रक्रियेवर सातत्याने होत असलेले आरोप यंत्रणेतील त्रुटी लक्षात आणून देत असल्याने त्यावर उपाय म्हणून सोशल इन्सेंटिव्ह रिविजन (एसआयआर) प्रक्रिया निवडणूक आयोगाने चालू केले आहे. उत्तर प्रदेश, राजस्थान,मध्यप्रदेश,छत्तीसगड, बंगाल, गुजरात,गोवा, केरळ, लक्षदीप, पुडूच्चेरी, अंदमान निकोबार येथे ही प्रक्रिया चालू झाली आहे.

सतत निवडणुकीत पराभव होत असल्याने काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी नवी दिल्लीमधील पत्रकार परिषदेत एकाच व्यक्तीच्या छायाचित्राचा वापर 22 वेगवेगळ्या नावांनी मतदानासाठी करण्यात आला आणि ती व्यक्ती म्हणजे ब्राझीलची मॉडेल असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर त्या मॉडेल जिचे नाव लारिसा असून या प्रकरणाशी माझा कोणताही संबंध नसल्याचे सांगितले. निवडणूक आयोगाचा विचारलेल्या प्रश्नांची आयोगाने दिलेली उत्तरे आहे आणि त्यांनी केलेले प्रतिप्रश्नाची उत्तरे काँग्रेसनी दिली नाही.

रिपोर्टनुसार बिहारमध्ये पैसे देऊन मी दोन तीनदा मतदान केले असे सांगणाऱ्या अनेक व्यक्ती उघड झाल्यावर आम्ही असे केलेच नाही असेच सांगितले गेले. राज्यातही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आहे.

जवळजवळ दोन दशकानंतर मतदानातील अनियमितता आणि त्रुटी दूर करण्याच्या दिशेने आयोगाने हे पाऊल उचलले आहे. विविध कारणांनी आणि परिस्थितीमुळे मतदानात विकृती निर्माण होते आणि परिणामी निवडणूक निकालांच्या विश्वासार्हते विषयी शंका निर्माण होतात. ती होऊ नये यासाठी खरे तर ही प्रक्रिया आहे. परंतु राजकारणाच्या अरुंद चष्म्यातून या प्रक्रियेकडे पाहिल्याने काही राज्य आणि राजकीय पक्ष या प्रक्रियेला विरोध करून संशयाचे वातावरण निर्माण करत आहे.

राजकीय लाभ हानीच्या पलीकडे जाऊन निवडणुकीत पारदर्शकता आणणे यावर लोकशाहीचे आरोग्य अवलंबून असते. लोकप्रतिनिधी कायदा 1950 च्या कलम 21 अंतर्गत निवडणूक आयोगाकडे मतदार सूची सिद्ध करण्याचा आणि तिच्यात सुधारणा करण्याचा अधिकार आहे.

स्वच्छ मतदार सूचीची मागणी करणारे पक्ष मतदार सूचीच्या पुनरावलोकन प्रक्रियेला विरोध करतात हे विचित्र आहे. प्रत्येकाने आयोगाला सहकार्य करण्याची गरज आहे

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.



## हिवाळ्यात फक्त एक चमचा मध खा पाहा, काय बदल होतोय ते!

हिवाळ्यात तापमान कमी होते, ज्यामुळे विविध आरोग्य समस्यांचा धोका वाढतो. ज्यांना आधीच काही आजार आहेत त्यांच्यासाठी थंडीचा काळ खूप आव्हानात्मक असू शकतो. हिवाळ्यात सर्दी, खोकला, घसा खवखवणे आणि अशक्तपणा हे आजार जास्त प्रमाणात दिसून येतात. म्हणून, दररोज फक्त 1 चमचा मध खाल्ल्याने आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण फायदे मिळू शकतात. मध केवळ स्वादिष्टच नाही तर त्यात औषधी गुणधर्म देखील आहेत.

आयुर्वेद तज्ज्ञांच्या मते, मधात नैसर्गिक अँटीऑक्सिडंट आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. हे गुणधर्म शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि विषाणूंशी लढण्याची क्षमता वाढवतात. हिवाळ्यात, लोकांना सर्दी आणि फ्लू सारख्या आजारांचा सामना करावा लागतो. म्हणून, सकाळी रिकाम्या पोटी 1 चमचा मध खाल्ल्याने संसगार्चा धोका कमी होतो.

मध घशातील खवखव कमी करते आणि खोकल्यापासून आराम देते. हे एक नैसर्गिक आणि सुरक्षित उपाय आहे, विशेषतः मुलांसाठी आणि वृद्धांसाठी. त्याचे अँटीऑक्सिडंट आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म घशातील खवखव कमी करतात आणि जळजळ कमी करतात. झोपण्यापूर्वी मधाचे सेवन केल्याने खोकला कमी होण्यास मदत होते आणि चांगली झोप येते.

मधाचे सेवन हृदयाच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. त्यात नैसर्गिक साखर आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यास आणि धमन्या स्वच्छ ठेवण्यास मदत करतात. दररोज एक चमचा मध आणि कोमट पाणी पिल्याने रक्त प्रवाह सुधारतो आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो.

मध हे पचनसंस्थेसाठी देखील खूप चांगले आहे. ते पोटातील हानिकारक बॅक्टेरिया नष्ट करते. बद्धकोष्ठता किंवा पोटात जडपणा यासारख्या समस्यांसाठी मध घेणे फायदेशीर आहे. कोमट पाण्यासोबत मध घेतल्याने पोट स्वच्छ राहते आणि अन्न चांगले पचते.

हिवाळ्यात, शरीराला अनेकदा आळस आणि थकवा जाणवतो. अशा परिस्थितीत, सकाळी एक चमचा मध घेतल्याने तुम्हाला दिवसभर ताजेपणा मिळतो आणि थकवा कमी होतो. हिवाळ्यात तुमच्या दैनंदिन दिनचर्येत मधाचा समावेश करून तुम्ही अनेक आजारांपासून आराम मिळवू शकता.

1 वर्षाखालील मुलांना कधीही मध देऊ नये, कारण त्यात बोटुलिझम बॅक्टेरिया असू शकतात, जे त्यांच्यासाठी धोकादायक आहे. मधुमेहींनी मधाचे सेवन सावधगिरीने करावे, कारण त्यात नैसर्गिक साखर असते जी रक्तातील साखर वाढवू शकते. याव्यतिरिक्त, ज्या लोकांना मधाची ॲलर्जी आहे त्यांनी ते अजिबात खाणे टाळावे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### अबब! मल्टिप्लेसचे दर..!

मल्टिप्लेसने कमालच केली
अबब! कॉफी
सातशे रुपये झाली..!

न्यायालयाने चिंता
केली व्यक्त
अशाने सिनेमागृहे
होतील रिक्त ..!

मल्टीप्लेसची हिंमत
वाढतच चालली
कारण प्रेक्षक बिल
चुकवतच चालली..

प्रेक्षकांनी जर
टाकला बहिष्कार
तर ते निश्चीतच
ताळ्यावर येणार ..!

# न.प.निवडणूक : अचलपूर विधानसभा मतदार संघात तीन पक्षांची रस्सीखेच

## उमेदवार घोषणेत पक्ष पेचात

## राजकीय समीकरणातील नव्या हालचालींना वेग

**बादल डकरे**

**चांदूर बाजार,( दि.10 )**– विधानसभा निवडणूकीत अचलपूर विधानसभा मतदारसंघात झालेल्या राजकीय उलथापालथीनंतर आता चांदूर बाजार आणि अचलपूर नगर परिषद निवडणूकीत तीन पक्षांची चांगलीच रस्सीखेच होणार असल्याचे स्पष्ट आहे. चांदूर बाजार नगर परिषदेच्या निवडणूकीमध्ये नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या पहिल्याच दिवशी एकही नामांकन दाखल झाले नाही. दुसरीकडे 'उमेदवारी निश्चित' असल्याचा दावा अनेक इच्छुक करत असले तरी, युतीच्या पेचामुळे प्रमुख पक्ष निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत.



गेले वीस वर्ष अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांचा पराभव करुन भाजपचे आमदार प्रवीण तायडे यांनी विजय मिळविला. त्यानंतर या वारंवार राजकीय संघर्ष होत असल्याचे पहायला मिळते. निवडणूकीच्या तोंडावर एकदा स्थानिक पातळीवर उफाळून आला आहे. विधानसभा निकालानंतर सत्तेचे समीकरण बदलल्याने दोन्ही नेते आपापला गड मजबूत करण्यासाठी तयारीला लागले आहे. प्रहार जनशक्ती पक्ष जनाधार टिकवण्यासाठी सज्ज आहे, तर सत्ताधारी भाजप नगर परिषदेत आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. दरम्यान, काँग्रेसनेही पुन्हा सक्रिय भूमिका घेतली असून, स्थानिक संघटना बळकट करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे. त्यामुळे प्रहार, भाजप आणि काँग्रेस यांच्यात तिहेरी लढत होणार हे आता निश्चित मानले जात आहे. दुसरीकडे शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात युतीबाबत चर्चा सुरू असली तरी अंतिम निर्णय झालेला नाही. नामांकन प्रक्रिया सुरू झाल्यानंतरही पहिल्याच दिवशी कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही, मात्र सर्वच इच्छुक आपापले कागदपत्र तयार करुन ठेवत आहे.

### नगर परिषद निवडणूक प्रतिष्ठेचे युध्द

गावोगावी बैठका, गुप्त चर्चासत्रे आणि जनसंपर्क मोहिमांना वेग आला आहे. काही उमेदवार पोस्टर, बॅनर आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली ताकद दाखवत आहेत, तर काहींनी घराघरात भेटीगाठी सुरू केल्या आहेत. नगर परिषदेतील सत्तेचा ताबा हे तिन्ही प्रमुख पक्षांसाठी प्रतिष्ठेचे युद्ध ठरणार आहे. बच्चू कडू यांच्यासाठी ही लढत जनाधाराची परीक्षा असेल, प्रवीण तायडे यांच्यासाठी सत्तेतील पकड कायम ठेवण्याची संधी, तर काँग्रेससाठी हरवलेला जनविश्वास परत मिळवण्याचे आव्हान आहे. राजकीय वर्तुळात चर्चा आहे की ही लढत केवळ नगर परिषद मर्यादित न राहता सन 2029 च्या विधानसभा निवडणुकांच्या समीकरणांवर निर्णायक परिणाम करणारी ठरेल. त्यामुळे या दोन्ही नगर परिषदांच्या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# मेळघाटच्या रस्त्यांवर धावताहेत खिळखिळ्या एसटी बस

- आदिवासी बांधवांचा प्रवास खडतर
- लोकप्रतिनिधींकडून लक्ष देण्याची मागणी





महासागर | प्रतिनिधी

**चुरणी,( दि.10 )** – मेळघाट परिसरातील आदिवासी नागरिकांचा प्रवास दिवसेंदिवस अधिक कठीण होत आहे. परतवाडा आगाराच्या वतीने दुर्गम अश्या मेळघाटच्या मार्गावर धावणाऱ्या राज्य परिवहनच्या अनेक बसगाड्या अक्षरश: खिळखिळ्या, भंगार अवस्थेत असून, या गाड्या वारंवार बंद पडत आहेत. परिणामी प्रवाशांना आपला प्रवास अर्ध्यावरच थांबवावा लागत आहे. अपर्यायाने मेळघाटवासियांना पायदळ प्रवासाचा पर्याय स्वीकारावा लागत आहे.

मेळघाटातील डोंगराळ रस्ते, वळणांचे घाट आणि दुर्दशा झालेल्या रस्त्यांची परिस्थिती आधीच प्रवासाला आव्हानात्मक बनवते. त्यातच या भागात नेमण्यात आलेल्या जुन्या व निकृष्ट बसगाड्यांमुळे प्रवासी अक्षरश: हैराण झाले आहेत. रविवार (दि. 9 नोव्हेंबर) रोजी परतवाडा–चिखलदरा–धारणी ही बस चिखलदरा येथे इंजिन गरम झाल्याने बंद पडली, त्यामूळे ही बस धारणीपर्यंत पोहोचलीच नाही. त्याच दिवशी यवतमाळ–चिखलदरा ही बसही चिखलदरामध्ये बंद पडल्याने प्रवाशांना तासन्तास ताटकळ थांबावे लागले.

तसेच हरी अमराई परिसरातही आणखी एक बस रस्त्यात बंद पडली. या घटना आता नेहमीच्या झाल्या आहेत. कधी इंजिन गरम होते, तर कधी टायर फुटतो, कधी ब्रेक फेल होतात त्यामुळे नागरिकांच्या जीवावर बेतणारी परिस्थिती निर्माण होत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, मेळघाटातील प्रवास आधीच खडतर आहे. त्यातच अशा बसगाड्या म्हणजे आमच्यावर अन्यायच आहे. प्रवाशांनी चांगल्या स्थितीत असलेल्या बसगाड्या या भागात सोडाव्यात, अशी मागणी केली आहे. एकूणच, मेळघाटच्या रस्त्यांवर धावणाऱ्या या भंगार बसगाड्यांमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात येत असून, लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

> कधी कधी ब्रेकडाऊन होतात. काल दोन–तीन गाड्या बंद पडल्या होत्या. पुढे या भागात चांगल्या गाड्या पाठवू आणि प्रवाशांची गैरसोय होऊ दिली जाणार नाही.
>
> **गोपाल चोरमले,**
> **सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक,**
> **परतवाडा आगार.**

# दाट वाढलेली झाडेझुडपे आरोग्यास घातक!

## स्क्रब टायफसपासून वाचण्यासाठी काळजी आवश्यक

महासागर | प्रतिनिधी

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि.10 )** – शहरात आणि ग्रामीण भागात पडीत जागांवर दाट वाढलेली झाडेझुडपे व गवत आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतात. अशा ठिकाणी वाढणाऱ्या कीटकांमुळे स्क्रब टायफस हा आजार पसरू शकतो, असा इशारा आरोग्य विभागाने दिला आहे. हा आजार रिकेटशिया प्रकारातील ओरियंटा टूसुगामुशी या जिवाणूमुळे होतो. हा जिवाणू दाट झाडीझुडपात राहतो आणि चिगार माईट या कीटकाद्वारे पसरतो. या कीटकाच्या चाव्यामुळे त्वचेवर लहान अल्सर तयार होतो, ज्याला 'इशार' म्हणतात. ताप, डोकेदुखी, अंगदुखी, कोरडा खोकला आणि अंगावर रॅश उठणे ही प्रमुख लक्षणे असून अशी चिन्हे



दिसल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांनी सांगितले. संक्रमण रोखण्यासाठी गावात तणनाशक फवारणी, मॅलेथीऑन पावडरची धुरळणी करावी. पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करावेत, शेतातून आल्यावर हात–पाय गरम पाण्याने धुवावेत, परिसर स्वच्छ ठेवावा आणि उंदरांची बिळे बुजवावीत.'भिती न बाळगता योग्य काळजी घेणे हेच स्क्रब टायफसवरील सर्वोत्तम प्रतिबंधक उपाय आहे,' असे डॉ. पोतदार

# नगराध्यक्ष पदाचा उमेदवार निवडणे पक्षांकरिता डोकेदुखी

## कडाक्याच्या थंडीत राजकीय वातावरण तापले

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.10 )**– अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक अवघ्या 20 दिवसांवर येऊन ठेपली आहे, ज्यामूळे कडाक्याच्या थंडीतही राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शहरात विविध पक्षांच्या बैठका सुरू असून, नगराध्यक्ष पदाचा उमेदवार निवडणे पक्षांसाठी डोकेदुखी ठरताना दिसत आहे.

महाविकास आघाडी व महायुती मधील मित्र पक्षांमध्ये ताळमेळ जमण्याची शक्यता अल्प दिसत आहे. दरम्यान, काँग्रेसकडून एका वरिष्ठ नेत्याच्या घरातील सदस्याला संधी मिळू शकते, या चर्चेनंतर पक्षातील गटबाजी




उफाळून येण्याची शक्यता आहे. पक्षाशी निष्ठा ठेवणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्याला तिकीट दिल्यास नाराजी कमी होऊ शकेल, अशी मतदारांमध्ये चर्चा सुरू आहे. भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनाही ऐनवेळी आपले उमेदवार जाहीर करण्याच्या तयारीत आहेत. मात्र, सर्व पक्षांची राजकीय स्थिती सध्या जवळपास सारखीच आहे. याच पार्श्वभूमीवर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आघाडी घेत आपला उमेदवार घोषित करून निवडणुकीला प्रारंभिक रंग दिला आहे. आता नगराध्यक्षपदासाठी कोण विजयी ठरतो, याकडे नांदगाव खंडेश्वरवासीयांचे लक्ष लागले आहे.



# महिलेशी अश्लील भाषेत संवाद

**अमरावती :** खोलापूर पोलीस स्टेशन परिसरातील एका महिलेला शेतातून घरी परतत असताना विनोद भगत या व्यक्तीने अश्लील भाषेत त्रास दिल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास खोलापूरी गेट पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मागर्गदर्शनात पोलिस कर्मचारी करीत आहे.

# अमोल सातपुते यांचे सीए परीक्षेत यश

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,( दि.10 )** – काकडा येथील अमोल रामदास सातपुते यांनी देशातील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत यश मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. सप्टेंबर 2025 मध्ये घेण्यात आलेल्या या परीक्षेचा निकाल 3 नोव्हेंबर रोजी जाहीर झाला.

अमोल यांनी शालेय शिक्षण श्रीमती जनाबाई नाथे विद्यालय, काकडा (कला शाखा) येथे पूर्ण केले. त्यानंतर अमरावती येथील केशरबाई लाहोटी महाविद्यालयातून बीबीए, तर पुणे विद्यापीठातून एमबीए पदवी संपादन केली. शिक्षणासोबत कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि



व्यवसाय सांभाळत त्यांनी सीए परीक्षेची तयारी केली. अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा असूनही चिकाटी, परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे काकडा व अंजनगाव परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालयाची राज्यस्तरावर भरारी

## हर्षल डाहे यांची उंच उडी व बांबू उडीत चमकदार कामगिरी

महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा,( दि.10 )** – राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती संचालित परतवाडा येथील सिद्धार्थ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी हर्षल पांडुरंग डाहे याने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यवतमाळ येथील जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या विभागीय स्पर्धेत त्याने उंच उडी (1.65 मी.) आणि बांबू उडी (2.70 मी.) या दोन्ही स्पर्धांमध्ये हर्षल ने प्रथम क्रमांक पटकावला. या कामगिरीच्या जोरावर त्याची



निवड रत्नागिरी जिल्ह्यातील डेरवण–चिपळून येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष क्षितीज अभ्यंकर म्हणाले की, खेळ हा विद्यार्थी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. खेळामुळे शिस्त, एकाग्रता, सहनशीलता आणि नेतृत्वगुण विकसित होतात. त्यांनी हर्षलचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. संस्थापक अध्यक्ष समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर, प्रा. शुभांगी अभ्यंकर, सचिव गजाननराव वानखडे, सहसचिव सतीश पुंडकर, प्राचार्य दिनेश मोहोड यांनीही अभिनंदन केले. हर्षलला क्रीडा शिक्षक विनायक डोईफोडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे हे विशेष.

# काकडा आरतीची महाप्रसादाने सांगता

## हरिनामाने दुमदूमली अंजनगाव बारी

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, ( दि.10 )**–अकराव्या महारुद्र हनुमान मंदिरात एक महिन्यापासून सुरू असलेल्या काकड आरती कार्यक्रमाची सांगता कार्तिक एकादशीच्या पार्श्वभूमीवर भव्य पालखी सोहळा व महाप्रसादाने करण्यात आली. दसऱ्यापासून सुरु झालेल्या या धार्मिक उपक्रमात



दररोज वारकरी भजन, आरती आणि हरिनामाच्या गजराने वातावरण दुमदुमले होते.

सकाळी गावातून निघालेल्या दिंडीत महिला, बालक आणि नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. पालखी सजावट बबलू राठोड व अंकुश तलमले यांनी केली होती. मार्गातील रस्ते महिलांनी स्वच्छ करून रांगोळ्यांनी सजवले. गावातील विविध मंदिरे पालखीने प्रदक्षिणा घातली. अखेर श्री अकरावा महारुद्र हनुमान मंदिरात दहीहांडी व गोपाल काला भजनानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. या उपक्रमात कदम परिवार, सुरेश दरोळी, बंडू टवलारे व वारकरी मंडळींचा सक्रिय सहभाग होता. भक्तीमय वातावरणात कार्यक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली.

# मुख्याधिकारी साहेब, स्वच्छ, सुंदर वरुड कधी?

## जुना भाजी बाजार परिसरात घाणीचे साम्राज्य



महासागर | प्रतिनिधी

**वरुड,( दि.10 )**– शहरातील जुना भाजी बाजार परिसर गेल्या काही दिवसांपासून अक्षरश: कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी वेढला आहे. येथे सर्वत्र दुर्गंधी पसरली असून नागरिक आणि व्यापारी या

### आरोग्य विभाग निद्रीस्त

घाणीच्या समस्येमुळे त्रस्त झाले आहेत. नगरपालिका आरोग्य विभागाचे अधिकारी मात्र 'झोपेत'असल्याची टीका करत मुख्याधिकारी साहेब, स्वच्छ, सुंदर वरुड कधी होणार? असा सवाल नागरिकांकडून होत आहे.

भाजी बाजार परिसरात दररोज शेकडो नागरिक खरेदीसाठी येतात. मात्र बाजाराच्या मध्यभागी आणि आजूबाजूला टाकलेला कचरा, सांडपाणी आणि अन्नाच्या अवशेष यामुळे आरोग्य धोक्यात आले आहे. कुत्रे, डुकरं आणि भटक्या जनावरांनी निर्माण केलेला धिंगाणा या समस्येला अधिक भयावह बनवत आहे. स्थानिक व्यापारी आणि नागरिकांनी अनेक वेळा नगरपरिषदेकडे तक्रारी केल्या, मात्र परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही. कचऱ्यामुळे ड्रेनेज लाईन खोळंबली असून सांडपाणी रस्त्यावर वाहताना दिसते. वाढत्या उकाड्यामुळे डेंग्यू, मलेरिया आणि दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांचा धोका वाढला आहे. कचरा उचलला जात नाही, सांडपाण्याचा त्रास वाढला असल्याचे स्थानिक नागरिक सांगतात.



> नगरपरिषद केवळ आश्वासने देते, प्रत्यक्षात काहीच काम होत नाही. आम्हाला स्वच्छता हवी आहे, आश्वासने नाहीत.
>
> **–डॉ. महेंद्र राऊत,**
> **सामाजिक कार्यकर्ते.**



> शहरात स्वच्छतेचा बोजवारा उडालेला आहे, जर स्वच्छतेबाबत तत्काळ उपाययोजना केल्या नाहीत, तर आम्ही आंदोलनाचा मार्ग अवलंबू.
>
> **सुशील बेले,**
> **सामाजिक कार्यकर्ते.**

# दिल्ली विकासाचे मॉडेल महाराष्ट्रात आणणार - राखी बिर्ला

## चांदूर रेल्वेतील आम आदमी पार्टीच्या कार्यकर्ता मेळाव्यात घोषणा

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.10 )**– दिल्लीतील शिक्षण, आरोग्य, वीज आणि पाणीपुरवठा यामध्ये आम आदमी पक्षाने घडवलेली क्रांती आता महाराष्ट्रातही घडवायची आहे, असे प्रतिपादन दिल्लीच्या माजी कॅबिनेट मंत्री राखी बिर्ला यांनी केले. त्या चांदूर रेल्वे येथे सोमवारी (ता. 10) संताबाई यादव मंगल कार्यालयात आयोजित आम आदमी पार्टीच्या भव्य कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होत्या. या वेळी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



बिर्ला म्हणाल्या की, शहरात उर्दू माध्यमाची शाळा फक्त 10वीपर्यंत असून, उच्च माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था नाही. प्रत्येक विद्यार्थ्यांला आपल्या भाषेत शिक्षण घेण्याचा हक्क आहे. त्यामुळे उर्दू माध्यमाचे कॉलेज उभारणे आमचे प्राधान्य राहील. त्यांनी पुढे महिलांच्या सुरक्षेसाठी सर्वत्र सीसीटीव्ही बसवण्याची, सरकारी दवाखान्यात औषध उपलब्धता आणि पूर्णवेळ डॉक्टर नेमणुकीची गरज अधोरेखित केली. स्वच्छ पाणीपुरवठा, क्रीडांगण, गार्डन तसेच सफाई कर्मचाऱ्यांना सेफ्टी किट व आरोग्य विमा देणे हे नगरपरिषदेचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. या मेळाव्यात प्रदेश उपाध्यक्ष प्रा. वसंतराव ढोके अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये अजित इंगोले, सुभाष गोहत्रे, डॉ. क्रांतीसागर ढोले, नम्रता गवळी आदी मान्यवर उपस्थित होते. राखी बिर्ला यांच्या भाषणाने सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# फ्लॉवरचं भरीत

**इटपट रेसिपी**

फ्लॉवरची भाजी आपण नेहमीच खातो. चवीत थोडा बदल हवा असेल तर तुम्ही फ्लॉवरचं भरीत करू शकता. झटपट होणारं हे भरीत तुमच्या जेवणाची लज्जत वाढवेल.

**साहित्य :** एक फ्लॉवर, अर्धा कप मटार, दोन टोमॅटो, एक कांदा, सात लसूण पाकळ्या, आल्याचा तुकडा, चार हिरव्या मिरच्या, लिंबाचा रस एक चमचा, अर्धा चमचा हळद, एक चमचा तिखट, थोडी राई, जीरं, चमचाभर बडिशेप, गरम मसाला, तेल, मीठ आणि कोथिंबिर.

**कृती :** फ्लॉवरचे बारीक तुकडे करून घ्या. कांदा आणि टोमॅटोही चिरून घ्या. गॅसवर कढई ठेवा. त्यात थोडं तेल घाला. तेल तापल्यावर राई घाला. राई तडतडली की जीरं घाला. मग कांदा घालून परतून घ्या. आलं-लसूण वाटून घ्या. कांदा सोनेरी झाला की त्यात आलं-लसूण पेस्ट घालून परता. मिरच्यांचे तुकडे घाला. मग हळद, तिखट, गरम मसाला, बडिशेप घाला. परतून घ्या. यानंतर टोमॅटो घाला. टोमॅटो शिजल्यावर त्यात फ्लॉवर आणि मटार घाला. मध्यम आचेवर शिजवून घ्या. फ्लॉवर आणि मटार शिजल्यावर मॅशरने मॅश करून घ्या. लिंबू पिळा. दोन मिनिटं शिजवा. गॅस बंद करून वरून कोथिंबिर घाला. हे भरीत पोळी किंवा पराठ्यासोबत छान लागेल.






## शेर की जुबानी

चाहत वो नहीं जो जान देती है,
चाहत वो नहीं जो मुस्कान देती है,
ऐ दोस्त चाहत तो वो है, जो पानी
में गिरा आँसू पहचान लेती है।

अब तो वो चाकू लेके
मेरे पिछे पडा है, उसे
कहा था दिल चीर के
देख,तेरा ही नाम होगा

होके मायूस ना यूं शाम
से ढलते रहिये।
जिंदगी भोर है सूरज
सा निकलते रहिये।

# तीनशे रुपयांवरून तीन कोटींची झेप

**अचिव्हर**



मध्य प्रदेशातील सागर येथील अंशुल सुहाणे यांनी २० वर्षांपूर्वी फक्त ३०० रुपयांपासून सुरू केलेला अगरबत्तीचा व्यवसाय आता तीन कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

अंशुल त्यांच्या पूनम अगरबत्ती कारखान्यातून दोनशे प्रकारच्या पूजा साहित्याचे उत्पादन करतात. ते देशभरातील १५ राज्यांना पुरवले जाते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, मध्य प्रदेशातील सागर अगरबत्तीच्या स्वरूपात देशभरात स्वतःची एक नवीन ओळख निर्माण करत आहेत. एकेकाळी सायकलवरून एक किंवा दोन रुपयांना अगरबत्ती विकून प्रवास करणारा अंशुल आता त्यांच्या कारखान्यात ३० लोकांना रोजगार देतो. तीनशे रुपयांवरून तीन कोटी रुपयांपर्यंत जाणे हा सोपा प्रवास नव्हता. त्यात अथक परिश्रम, तीव्र संघर्ष आणि असंख्य आव्हाने होती. त्यावर त्यांनी मोठ्या संयमाने आणि चिकाटीने मात केली.

अंशुल यांच्या कुटुंबात गेल्या तीन पिढ्यांपासून हे काम सुरू आहे. त्यांचे आजोबा अगरबत्तीच्या कारखान्यात बुककीपर होते. त्यांचे वडील त्याच अगरबत्तीच्या कारखान्यात सेल्समन होते. त्यामुळे त्यांना करावे लागणारे कष्ट ते पाहत होते. म्हणून त्यांना वाटले, की आपण इतरांसाठी जे काम करतो, ते आपल्यासाठीच केले तर नफा वाढवता येईल. या विचाराने त्यांनी हा व्यवसाय सुरू केला. तीनशे रुपये किमतीचा कच्चा माल खरेदी केला. घरी अगरबत्ती बनवल्या आणि नंतर त्या विकल्या. ते सायकलने दररोज २० ते २५ किलोमीटर प्रवास करायचे. दुकानदारांकडे जायचे; पण स्थानिक अगरबत्तीमुळे कोणीही त्या खरेदी करत नव्हते. त्या वेळी बंगाल आणि बेंगळुरू येथील अगरबत्ती सागरमध्ये खूप लोकप्रिय होत्या, म्हणून लोकांनी त्यांच्या अगरबत्तीकडे दुर्लक्ष केले.

अगरबत्ती विकली जात नव्हती, तेव्हा त्यांनी कधीकधी बाजारात रस्त्याच्या कडेला चटई पसरवून त्या किरकोळ विक्रीसाठी ५० पैसे, एक रुपया आणि दोन रुपयांना विकल्या. त्यांच्या चांगल्या गुणवत्तेमुळे अगरबत्तींना मान्यता मिळू लागली आणि नंतर त्यांनी त्या धाकटी बहीम पूनमच्या नावावर रजिस्टर केली. एक कारखाना सुरू केला. आता ती देशभरात पूनम अगरबत्ती म्हणून ओळखली जाते. पूजा साहित्य, अगरबत्ती आदींशी संबंधित करत असलेल्या सर्व कामांमध्ये महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी त्यांनी ९० टक्के कामे महिलांना दिली आहेत. अंशुलचे वडील वीरेंद्र सुहाणे आणि त्यांची पत्नीदेखील त्यांच्या कामात त्यांना मदत करतात.

## टेक्नो टॉक




### 'व्हॉट्सअ‍ॅप' प्रोफाईलला आकर्षक बनवणार

'व्हॉट्सअ‍ॅप' आता तुमच्या प्रोफाइलला आणखी आकर्षक आणि पर्सनल बनवण्यासाठी एक धमाकेदार अपडेट घेऊन येत आहे. फेसबुक किंवा लिंक्डइनप्रमाणे आता व्हॉटस्प' प्रोफाइलवर कव्हर फोटो जोडू शकता. आता फक्त प्रोफाइल फोटोपुरते मर्यादित राहण्याची गरज नाही. हा फोटो तुमच्या प्रोफाइलच्या वरच्या भागात मोठा दिसेल. त्यामुळे प्रोफाइल आणखी स्टायलिश होईल. WBetaInfo च्या रिपोर्टनुसार व्हॉट्सअ‍ॅपचे हे नवीन फीचर सध्या टेस्टिंगमध्ये आहे. सध्या ते फक्त व्हॉट्सअ‍ॅप बिझनेस अकाउंट्ससाठी उपलब्ध आहे, पण लवकरच ते सर्व सामान्य वापरकर्त्यांसाठी रोल आउट होईल. अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२५.३२.२ मध्ये हे फीचर चाचणीला आहे. प्रोफाइल सेटिंग्जमधून तुम्ही तुमचा आवडता फोटो अपलोड करू शकता. यामुळे चॅटिंगचा अनुभव अधिक मजेदार आणि पर्सनल होईल. व्हॉट्सअ‍ॅपने यात खास सेटिंग्ज जोडल्या आहेत. तुम्ही ठरवू शकता, की कव्हर फोटो कोण पाहू शकेल. 'Everyone', 'My Contacts' किंवा 'No one'. हे पर्याय स्टेटस आणि प्रोफाइल फोटो प्रायव्हसीसारखेच असतील. तुमची माहिती सुरक्षित राहील आणि फक्त तुम्ही ठरवलेल्यांनाच दिसेल. व्हॉट्सअ‍ॅप नेहमीच वापरकर्त्यांना नवीन सुविधा देत असते. हे फीचर आल्यावर तुमचे प्रोफाइल फक्त नाव आणि फोटोचे राहणार नाही, तर ते तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब बनेल. मित्रांना, कुटुंबीयांना तुमची क्रिएटिव्हिटी दाखवा.

# नावीन्यपूर्ण करिअरच्या वाटा

**करियर**



डिजिटल क्रांती, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि ऑटोमेशनमुळे जगभरातील रोजगार जगात मोठे बदल होत आहेत. काही दशकांपूर्वी अपरिहार्य वाटणाऱ्या अनेक नोकऱ्या आता सामान्य होत आहेत, तर त्याच वेळी नावीन्यपूर्णता आणि वेगवेगळ्या करिअरचा वेगही झपाट्याने वाढत आहे.

**नाहीशा होणाऱ्या नोकऱ्या**

**१. कॅशियर आणि बँक टेलर**

डिजिटल पेमेंट, यूपीआय आणि नेट बँकिंगच्या वापरामुळे कर्मचाऱ्यांना बँकांशी थेट व्यवहार करण्याची गरज कमी झाली आहे.

**२. कॉल सेंटर ऑपरेटर**

एआय आणि चॅटबॉट्स ग्राहकांच्या समस्या सोडवत असल्याने पारंपारिक कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या लोकांची संख्या कमी होत आहे.

**३. ट्रॅव्हल एजंट**

ऑनलाइन बुकिंग अ‍ॅप्स आणि वेबसाइट्समुळे लोक स्वतःहून त्यांच्या प्रवासाचे नियोजन करतात. त्यामुळे ट्रॅव्हल एजंट्सची गरज जवळजवळ संपली आहे.

**४. ट्रक ड्रायव्हर**

स्वयंचलित वाहनांच्या आगमनामुळे भविष्यात ट्रक ड्रायव्हर्सची मागणी लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते.

**५. टेलिमार्केटर**

स्वयंचलित व्हॉइस कॉल सिस्टीममुळे टेलिमार्केटिंग करणाऱ्यांची गरज कमी होते.

**६. कार्यालयीन सहाय्यक आणि लिपिक**

बैठकांचे वेळापत्रक, फाइल व्यवस्थापन आणि मेल हाताळणीसाठी डिजिटल साधने आणि सॉफ्टवेअर वापरले जातात.

**नवीन नोकऱ्या**

*** कृत्रिम बुद्धिमत्ता अभियंते (एआय अभियंते)**

सर्व क्षेत्रात 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने, या क्षेत्रातील तज्ज्ञांची मागणी झपाट्याने वाढणार आहे.

*** सायबरसुरक्षा तज्ज्ञ**

डिजिटल वर्तन आणि डेटा गोपनीयतेच्या वाढत्या धोक्यामुळे सायबरसुरक्षा क्षेत्रातील करिअर अधिक स्थिर आणि फायदेशीर होतील.

*** डेटा सायंटिस्ट आणि विश्लेषक**

मोठ्या प्रमाणावर गोळा केलेल्या डेटाचे विश्लेषण करून निर्णय घेण्याची गरज या क्षेत्रातील कंपन्या किंवा तज्ज्ञांना आहे.

*** गेम डेव्हलपर आणि अ‍ॅनिमेटर**

मनोरंजन आणि शिक्षण क्षेत्रात डिजिटल कंटेंटच्या वाढत्या मागणीमुळे, या क्षेत्रात भरपूर संधी उपलब्ध आहेत.

*** पर्यावरण आणि शाश्वत विकासतज्ज्ञ**

जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षण क्षेत्रातील कारकिर्द महत्त्वाची बनेल.

*** डिजिटल मार्केटिंग आणि सोशल मीडिया मॅनेजर**

ब्रँड आणि कंपन्यांना त्यांची ऑनलाइन उपस्थिती टिकवून ठेवण्यासाठी या क्षेत्रातील कुशल तज्ज्ञांची मागणी सतत वाढत आहे.

*** वैद्यकीय सुधारक आणि जैवतंत्रज्ञानशास्त्रज्ञ**

आरोग्यशी संबंधित सुधारणा, ग्लुटेन उत्पादन आणि औषध विकासामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे.

*** रोबोटिक्स अभियंता**

औद्योगिक क्षेत्रात रोबोटचा वापर वाढल्याने, या क्षेत्रातील अभियंत्यांना मोठ्या संधी मिळतील.

# वयात अंतर आहे

**मॅच मेकिंग**



मी २७ वर्षांची तरुणी असून एका कंपनीत उच्चपदस्थ अधिकारी आहे. माझं एका मुलावर प्रेम आहे. पण तो माझ्याहून पाच वर्षांनी लहान आहे. आम्ही शेजारी असून लहानपणापासून एकमेकांना ओळखतो. आमचे कुटुंबिय हे नातं स्वीकारण्याची शक्यता तशी कमी असली तरी या नात्याचा गांभीर्याने विचार करावा असं मला वाटतं. या मुलाचंही माझ्यावर प्रेम असावं. हा मुलगा २२ वर्षांचा असून त्याचं शिक्षण पूर्ण व्हायचं आहे. त्याला मास्टर्स करायचं आहे. मला हा मुलगा आवडतो. अशा परिस्थितीत मी काय करू?

**उत्तर :** वयात अंतर असूनही आनंदाने संसार करणारी बरीच जोडपी पहायला मिळतात. अशा नात्यांमध्ये दोघांनीही एकमेकांना समजून घ्यायला हवं. दुसरं म्हणजे तुला या मुलाबद्दल फक्त आकर्षण वाटतं का हे खरंच प्रेम आहे, हे आधी ठरवून घे. या मुलाचंही तुझ्यावर प्रेम असल्याचं तू गृहित धरलं आहेस. त्याला तुझ्याबद्दल नेमकं काय वाटतं हे आधी जाणून घे. याबाबत त्याच्याशी बोल. त्यालाही तुझ्याबद्दल प्रेम वाटत असेल तर पुढे जाता येईल. तू आयुष्यात यशस्वी आहेस. पण या मुलाचं शिक्षण सुरू आहे. त्यामुळे त्यालाही करिअर घडवायचं असेल. म्हणूनच त्याच्या मनातलं जाणून घे. गरज पडल्यास समुपदेशकांची मदत घे.

## फॅशन पॅशन



### पुरुषांच्या पादत्राणांची शैली

मुलींकडे चप्पल, हील्स, फ्लॅट्स, शूज, बूट, लोफर्स, सँडल, कोल्हापुरी चप्पल अशी विविध प्रकारची पादत्राणे असतात. मुलांकडे चप्पलपासून ते लोफर्स, शूज आणि बूटपर्यंत विविध पर्याय आहेत. तथापि, बाजारात अनेक प्रकारचे लोफर्स, शूज आणि बूट उपलब्ध आहेत. प्रत्येक प्रकार त्याच्या अद्वितीय शैलीसाठी ओळखला जातो.

*** टी-शर्ट आणि जीन्स-** टी-शर्ट आणि जीन्सबरोबर स्नीकर्स, ब्लाउसन मोजे, टॅन बूट, ब्लॅक लेस-अप आणि गुडघ्यापर्यंतचे बूट वापरू शकता.

*** शॉर्ट्स-** शॉर्ट्सबरोबर बूट शूज, स्नीकर्स आणि एस्पॅड्रिल टी-शर्ट आणि जोडू शकता.

*** चिनोज-** चिनोज छान दिसतात. मुले त्यावर टी-शर्ट आणि शर्टसदेखील घालू शकतात. चिनोजबरोबर स्नीकर्स, कॅम्प मॅक्स आणि पेनी लोफर्स वापरू शकता.


*** ड्रेस पॅन्ट-** आजकाल बहुतेक मुले ड्रेस पॅन्ट पसंत करतात. ते घालायला जितके आरामदायी आहेत तितकेच ते दिसायलाही सुंदर आहेत. तुम्ही त्याबरोबर मंक स्ट्रॅप्स, विंगटिप्स, ब्रोग्स, कॅपटोज आणि प्लेन टो ब्लूचर घालू शकता.

*** एथनिक वेअर-** सूट आणि कुर्ता पायजामा सारख्या एथनिक वेअरबरोबर संपूर्ण कट शूज, कॅप टोज आणि चेल्सी बूट घालू शकता. याशिवाय, मुलांसाठी इतरही अनेक पादत्राणे आहेत.

# दक्षिण भारतातील प्रेक्षणीय पर्यटनस्थळे

**भटकंती**





दक्षिण भारतात एक्सप्लोर करण्यासारखे बरेच काही आहे. कुठे जायचे, तिथे कसे जायचे आणि किती खर्च येईल याबद्दल लोक अनेकदा गोंधळलेले असतात.

*** केरळमधील निसर्गाचा आनंद घ्या**

केरळ हे दक्षिण भारतातील सर्वात सुंदर राज्यांपैकी एक आहे. येथील नैसर्गिक दृश्ये तुम्हाला मंत्रमुग्ध करतील. केरळमध्ये तुम्हाला निसर्गाच्या सानिध्यात हरवून गेल्यासारखं वाटेल. कारण हे राज्य हिरव्यागार झाडांनी वेढलेले आहे. अलेप्पीचे बॅकवॉटर, आयुर्वेदिक मसाले आणि हाऊसबोट्स हे पाहून फिरण्याचा आनंद द्विगुणित करेलच. मुन्नार, अलेप्पी, कोची आणि थेक्कडी अशी अनेक ठिकाणे आहेत. केरळमधील कोणत्याही शहरात जाण्यासाठी तुम्ही विमान आणि ट्रेनने जाऊ शकता. केरळ फिरण्याचा खर्च तुमच्या राहण्याचा खर्च, जेवण आणि पर्यटनावर अवलंबून दहा ते वीस हजार रुपयांपर्यंत होऊ शकतो.


*** तामिळनाडूची प्राचीन मंदिरे**

तामिळनाडू प्राचीन मंदिरांसाठी ओळखले जाते. शिवाय हे राज्य संस्कृती, शास्त्रीय नृत्य, भरतनाट्यमसाठी प्रसिद्ध आहे. मदुराई (मीनाक्षी मंदिर), तंजावर, रामेश्वरम आणि कन्याकुमारी ही ठिकाणे भेट देण्यासाठी सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक आहेत. तुम्ही धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी दक्षिण भारतात येत असाल, तर तामिळनाडूपेक्षा चांगले काहीही नाही. येथील मंदिरे इतकी सुंदर आहेत, की तुम्ही त्यांच्या सौंदर्याने मोहित व्हाल. समुद्रकिनाऱ्यांना भेट दिल्याने सूर्यास्ताचे एक चित्तथरारक दृश्य दिसते. तुम्ही येथे ट्रेन, विमान किंवा स्वत:च्या गाडीने येऊ शकता. बजेटनुसार, ते केरळपेक्षा थोडे स्वस्त आहे. तुम्ही ८,००० ते १५,००० रुपयांत येथील ठिकाणांना भेट देऊ शकता.

*** कर्नाटक एक चांगला पर्याय**

कर्नाटक पर्यटकांमध्येही खूप लोकप्रिय आहे. येथे तुम्हाला इतिहास आणि निसर्गाचा संगम दिसेल. हंपीच्या अवशेषांपासून ते कॉफीच्या बागांपर्यंत, येथील प्रत्येक गोष्ट खरोखरच मनमोहक आहे. म्हैसूर पॅलेस कर्नाटकात आहे. कर्नाटकमध्ये असंख्य हिल स्टेशन्स आहेत. तिथे ट्रेकिंग, पॅलेस टूर आणि कॉफीची चव घेण्याचा अनुभव मिळतो. कर्नाटकमध्ये दोन आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत. त्यामुळे तुम्ही विमानानेदेखील या ठिकाणी पोहोचू शकता. रेल्वे प्रवास थोडा जास्त असू शकतो. तुम्ही टूर पॅकेज घेऊन गेलात, तर तुम्ही सुमारे ३० हजार रुपये खर्च येऊ शकतो.

## फिटनेस फंडा



### कसं धावायचं?

शरीराला बरेच लाभ मिळवून देणारा व्यायाम म्हणजे धावणं. बरेच जण नियमित धावतात तर काहींना धावायला सुरूवात करायची असते. अशा वेळी नेमकं किती धावायला हवं, किती अंतर कापायला हवं असे प्रश्न उपस्थित होतात. प्रत्यक्षात अंतरापेक्षाही धावण्याचा कालावधी महत्त्वाचा ठरतो. सर्वसाधारणपणे ३० मिनिटं धावल्याने बरेच लाभ मिळू शकतात. मात्र धावण्याचा कालावधी व्यक्तीनुसार, वजन कमी करण्याच्या उद्दिष्टांनुसार बदलू शकतो. नव्याने धावायला सुरूवात करणाऱ्यांनी थोडं दमाने घ्यायला हवं. तुम्हाला दुसऱ्या व्यायामाची सवय असली तरी धावणं हा पूर्णपणे वेगळा व्यायाम आहे. त्यामुळे शरीराला धावण्याची सवय व्हायला थोडा वेळ लागतो. म्हणूनच दुखापत टाळण्यासाठी सुरूवातीला हळू धावावं. काही दिवसांनी वेग वाढवत न्यावा. शरीराला धावण्याची सवय लागावी यासाठी तीन मिनिटं धावून मिनिटभर चालावं. असं दहा ते पंधरावेळा करता येईल. 'अमेरिकन हार्ट असोसिएशन'च्या म्हणण्यानुसार दिवसातून दोन किंवा तीन वेळा दहा ते पंधरा मिनिटं धावल्यानेही सलग ३०मिनिटं धावण्याचे लाभ मिळू शकतात. तुमच्या किती कॅलरी खर्च होणार हे धावण्याच्या वेगावर ठरतं. चढावर धावताना शरीराला जास्त ऊर्जा लागते. त्यामुळे अधिक कॅलरी खर्च होतात.

# इंजिनियरिंगनंतर एमबीए करावं का?

**उच्चशिक्षण**




एमबीए या अभ्यासक्रमाला सध्या प्रचंड मागणी आहे. एमबीए झाल्यानंतर चांगल्या कंपनीत भरपूर पगाराची नोकरी मिळते. म्हणून एमबीए करण्याकडे बऱ्याच तरुणांचा ओढा असतो. एमबीए प्रवेशासाठी 'कॉमन ॲडमिशन टेस्ट' म्हणजे 'कॅट' परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इंजिनिअरींग केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच जास्त असते. आता इंजिनिअरींगची पदवी मिळवल्यानंतर एमबीए करावं का, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. याबाबतचं मार्गदर्शन...

* इंजिनिअरींग केलेल्या विद्यार्थ्यांकडे तांत्रिक ज्ञान असतं. या ज्ञानाला एमबीएची जोड दिल्यावर विद्यार्थ्यांना व्यावसायिक ज्ञान मिळतं. अशा विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होतात. दोन्ही विषयांचं ज्ञान असणाऱ्या उमेदवारांना मागणीही वाढते. इंजिनिअरींगनंतर विद्यार्थी त्यांच्या शाखेशी संबधित नोकऱ्यांसाठी अर्ज करू शकतात. मात्र एमबीए केल्यानंतर भारतीय कंपन्यांसह बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये संधी मिळू शकते. शिवाय स्वत:चा उद्योगही सुरू करता येतो.

* इंजिनिअरींगचं विश्व तुलनेने बरंच लहान आहे. मात्र एमबीए केल्यानंतर असंख्य कंपन्यांची कवाडं तुमच्यासाठी खुली होऊ शकतात. एमबीए केल्यामुळे तुम्ही व्यवसायाशी संबंधित सर्व माहिती मिळवू शकता. सध्या स्टार्ट अप्सची चलती आहे. इंजिनिअरींगसह एमबीएचं ज्ञान असेल तर तुम्ही स्वत:चा उद्योग सुरू करू शकता. विविध संकल्पनांवर आधारित स्टार्ट अप्स चांगली कामगिरी करताना दिसतात. त्यामुळे इंजिनिअरींग केल्यानंतर एमबीए करणं अनेक अर्थांनी योग्य ठरतं.

# ड्रोन तंत्रज्ञानाने वाढता रोजगार

**वेगळ्या वाटा**



सुरुवातीला लष्करी वापरासाठी वापरली जाणारी ड्रोन किंवा मानवरहित हवाई वाहने नागरी वापरासाठी मोठ्या प्रमाणात वापरली जाऊ लागली, तेव्हा ड्रोन लोकप्रिय झाले. सध्या ड्रोन तंत्रज्ञानाने लक्ष वेधून घेतले आहे.

सातत्याने ड्रोन तंत्रज्ञानात वेगाने प्रगती होत आहे. ड्रोन किंवा मानवरहित हवाई वाहने अनेक कॉन्फिग्युरेशनमध्ये येऊ शकतात. सर्व त्यांच्या डिझाइन, उड्डाण वैशिष्ट्यांवर आणि कार्यक्षमतेवर आधारित विशिष्ट कार्यांसाठी डिझाइन केलेले असतात. आवश्यक त्या उंचीवर उड्डाण करण्याचे फायदे, वेग, लवचिकता आणि निरीक्षण उपकरणे आणि सेन्सरसारखी उपकरणे वाहून नेण्याची त्यांची क्षमता यामुळे, शेती, वनीकरण, पायाभूत सुविधा, भू-तंत्रज्ञान अभियांत्रिकी इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा वापर अधिक प्रमाणात केला जात आहे.

*** सध्याचे ड्रोन तंत्रज्ञान**

अलिकडच्या वर्षांत ड्रोन-आधारित प्रणालींवरील शैक्षणिक संशोधन वाढत आहे. ज्यामध्ये सिस्टम डिझाइन, हार्डवेअर, प्रोपल्शन सिस्टीम, ऊर्जा तंत्रज्ञान, नियंत्रण प्रणाली आणि लँडिंग सिस्टीम यांसारख्या तांत्रिक हार्डवेअरवरील ड्रोनच्या विविध पैलूंवर लक्ष केंद्रित केले जात आहे. ड्रोन सॉफ्टवेअर ड्रोन ऑपरेशन्सना पुढे नेण्यात आणि सुव्यवस्थित करण्यात, उड्डाण नियंत्रण, पर्यावरण संवाद, डेटा प्रक्रिया आणि विश्लेषण, नेटवर्किंग आणि संप्रेषण, सुरक्षा आणि गोपनीयता यांचा समावेश करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. आजकाल ड्रोन ऑपरेशन्सना सक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणक विज्ञान, ऑब्जेक्ट टाळण्याचे तंत्रज्ञान, बिग डेटा आणि ब्लॉकचेन यासारख्या अनेक प्रगत तंत्रज्ञानाचा संयुक्तपणे विकास करण्यात आला आहे.

*** ड्रोन सॉफ्टवेअर अभियांत्रिकी आव्हाने**

ड्रोन सॉफ्टवेअर अभियांत्रिकी क्षेत्रात, संशोधकांना अनेक महत्त्वपूर्ण आव्हानांचा सामना करावा लागतो. प्रथम रिअल-टाइम नियंत्रण प्रणाली आणि जलद प्रतिसाद देण्याची क्षमता महत्त्वाची आहे, कारण कोणताही विलंब नियंत्रण गमावण्याचा आणि अपघातांचा धोका निर्माण करू शकतो. याव्यतिरिक्त रिअल-टाइममध्ये 'ग्लोबल पोझिशनिंग सिस्टम' (जीपीएस), इनरशल मेजरमेन्ट युनिट (आयएमयू) आणि कॅमेरे यासारख्या वेगवेगळ्या सेन्सर्समधून डेटा एकत्र करणे आणि प्रक्रिया करणे खूप क्लिष्ट आहे. ड्रोनसाठी स्वायत्तता, निर्णय घेण्याची आणि सुरक्षित नेव्हिगेशन क्षमता विकसित करणे हे महत्त्वाचे आव्हान आहे. त्यासाठी अनिश्चितता आणि बदलणारे वातावरण हाताळण्यासाठी अल्गोरिदम आवश्यक आहेत. या वापराच्या धोकादायक स्वरूपामुळे ड्रोन सॉफ्टवेअरसाठी विश्वासार्हता आणि अनावश्यक गोष्टी सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. बॅटरी व्यवस्थापन आणि पॉवर ऑप्टिमायझेशन देखील महत्त्वाचा मुद्दा आहे.

# फॅशन लग्नसराईतली...

**फॅशन पॅशन**



लग्नसमारंभासाठीच्या या स्टायलिंग टिप्स...

* थोडं हटके आणि स्टायलिश दिसायचं असेल तर कुर्त्यावर लेअरिंग करता येईल. छान नक्षीकाम केलेला क्रीम कुर्ता घ्या. त्यावर लांब बंदगळा कॅरी करा. चुडीदार कुर्ता आणि बंदगळा यात तुम्ही भाव खाऊन जाल.

* साधेपणातही स्टाईल जपता येते. थोडं नक्षीकाम असणारा बेज रंगाचा कुर्ता आणि जोधपुरी पँट कॅरी करा. त्यावर कोल्हापुरी चप्पल घाला. यात तुम्ही नक्कीच उठून दिसाल. हा पेहराव कोणत्याही ऑकेजनची शान ठरेल.

* प्रिंटेड कुर्ता कोणत्याही कार्यक्रमात शोभून दिसतो. त्यामुळे छानसा प्रिंटेड कुर्ता विकत घ्या. साखरपुडा असो किंवा रिसेप्शन, या प्रसंगी तुम्ही प्रिंटेड कुर्ता घालू शकता. प्रिंटेड कुर्त्यावर बेज रंगाची पँट घालता येईल.

* लग्न सोहळ्यात शेरवानीला बरीच मागणी असते. बरीच मुलं शेरवानी घालून मिरवतात.

# मिहानमधील ८ कंपन्यांचे भूखंड रद्द

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :
मिहानमध्ये विशेष आर्थिक क्षेत्रात (सेझ) व्यवसाय सुरू करण्यासाठी दिलेल्या भूखंडांपैकी आठ भूखंड संबंधित कंपन्यांनी व्यवसाय सुरू न केल्याने रद्द करण्यात आले आहे.

मिहान सेझमध्ये आजपर्यंत केवळ २४ तर गैरसेझमधील २८ प्रकल्पच सुरू झाले आहे, असे माहिती अधिकारातून प्राप्त तपशिलातून स्पष्ट झाले आहे. सत्ताधाऱ्यांकडून सातत्याने मिहानमध्ये जागा शिल्लक नसल्याचा दावा होतो. या आकडेवारीवरून या दाव्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

राज्यातील महत्वाच्या सेझ प्रकल्पापैकी एक म्हणून मिहानची ख्याती आहे. विदभार्तील सर्वात महत्वाच्या प्रकल्प म्हणून मिहानला बघितले जात होते.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या (एम.ए.डी. सी.) माहितीनुसार, मिहान सेझ परिसरात एकूण ७८ वेगवेगळ्या कंपन्यांना भूखंड वाटप करण्यात आले आहे. गैरसेझ क्षेत्रात एम्स रुग्णालयासह इतर एकूण ५२ संस्थांना जागा देण्यात आली. त्यापैकी सेझमध्ये ७८ पैकी केवळ २४ कंपन्यांचे काम सुरू झाले तर ४ कंपन्यांचे बांधकाम सुरू आहे.

१९ कंपन्यांना नव्याने जागा देण्यात आली. ३१ कंपन्या लवकरच सुरू होणार असल्याचा एमएडीसीचा दावा आहे. तर गैरसेझमधील २८ संस्थांचे काम सुरू झाले आहे. तीन कंपन्यांचे बांधकाम सुरू आहे. ११ कंपन्यांना नव्याने जागा आवंटित केली गेली, तर १० कंपन्यांचे काम लवकरच सुरू होण्याचा दावा एमएडीसीने केला आहे, असे माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांना यासंदर्भात प्राप्त झालेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते. त्यामुळे मिहान प्रकल्पाच्या विकासाबाबत सत्ताधारी पक्षाकडून होणाऱ्या दाव्यावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मिहान-सेझमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या ७८७७१ आणि सेझबाहेरील क्षेत्रात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ३७६६४ अशा एकूण १ लाख १६ हजार ४३५ जणांना रोजगार मिळाला, असा दावा एमएडीसीकडून करण्यात आला. यात विदर्भातील किती व त्याबाबत माहिती उपलब्ध नसल्याचेही एमएडीसीकडून कळवण्यात आले.




**सेझमधील १२ कंपन्यांकडे ३२ कोटी रुपयांची थकबाकी**

मिहानमधील सेझ परिसरातील १२ कंपन्यांकडून एमएडीसीला ३२ कोटी आणि सेझबाहेरील परिसरातून १ कंपनीकडून २९.२१ लाख रुपये मिळणे शिल्लक असल्याचेही माहिती अधिकारातून कोलरकर यांनी पुढे आणले.

## ३८ वर्षानंतर कृषी विभागात बदल

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १० :
राज्यात कृषी क्षेत्र अत्यंत महत्त्वपूर्ण. महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे कृषी विभागाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त होते. आता राज्यातील कृषी विभागात मोठे परिवर्तन होणार आहे.

तब्बल ३८ वर्षानंतर कृषी विभागात मोठा बदल करण्यात आला आहे. या बदलातून कृषी विभागाला नवी ओळख प्राप्त होईल. सन १८८१ च्या फेमीन कमिशनने शिफारस केल्यानुसार जुलै १८८३ मध्ये कृषी खात्याची स्थापना करण्यात आली. सद्यस्थितीत कृषी विभागाचे वापरले जात असलेले बोधचिन्ह व घोषवाक्य हे ३८ वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेले आहे.

आता कृषी विभागासाठी नवे बोधचिन्ह व घोषवाक्य निश्चित केले. आगामी काळात कृषी विभागाच्या सर्व उपक्रमांत त्याचा वापर केला जाणार आहे.

आधुनिक शेतीच्या दृष्टीकोनात व विभागाच्या कार्य पद्धतीत झालेल्या मूलभूत बदलांच्या पार्श्वभूमीवर यापूर्वीचे बोधचिन्ह रचना, दृश्य व संवादात्मक ओळख कालबाह्य ठरू लागले. त्यामुळे नव्या बोधचिन्ह व घोषवाक्यासाठी खुली स्पर्धा घेण्यात आली.

त्यातून भुसावळचे वीरेंद्र पाटील यांनी सुचवलेले बोधचिन्ह, परभणी येथील सिद्धी भारतराव देसाई यांचे घोषवाक्य निवडण्यात आले. त्यानुसार समितीद्वारे विचार विनिमय होऊन कृषी विभागाचे नवीन बोधचिन्ह व घोषवाक्य निश्चित केले. कृषी विभागाचे नवे कृषी कल्याण कर्तव्यम बोधचिन्ह व शाश्वत शेती, समृद्ध शेतकरी घोषवाक्य यापुढे कृषी विभागाच्या सर्व उपक्रमामध्ये वापरण्यात येणार आहे.




कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाने १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार सर्व शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी करण्याच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. ॲग्रीस्टॅक नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेली रक्कम तात्काळ जमा करण्यात येत आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना ई-केवायसी करण्याची आवश्यकता नाही.

त्यामुळे अद्यापही ज्या शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही, त्या सर्व शेतकऱ्यांनी आपला गाव नमूना क्र. सातबारा उतारा व आधारपत्रासह आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आपली ॲग्रीस्टॅक नोंदणी करून शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या नोंदणीमुळे शेतकऱ्यांना मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

## निवडणूक आयुक्तांना गड्डी मिळाली असावी...

### ईव्हीएमवरून बच्चू कडूंचा गंभीर आरोप



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १० :
नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका होत आहेत. पण, आमचा आंदोलनातच जास्त वेळ गेला. निवडणुकीची तयारी करण्यासाठी आम्हाला फार कमी वेळ मिळाला. ईव्हीएमचा घोळ नको व्हायला, सगळे नामर्दाचे अवलाद आहेत. मशीन समोर करतात. मशीनमधून मतचोरी करतात. मी ज्याला मतदान केले, ते त्यालाच गेले की, दुसऱ्याला गेले, हे निवडणूक आयोग सांगू शकते का, असा सवाल बच्चू कडू यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला. निवडणूक आयुक्तांना गड्डी मिळाली असेल, त्यामुळे हे सर्व सुरू आहे, असा आरोपही त्यांनी केला.

बच्चू कडू हे कर्जमाफीच्या मुद्यावर चांगलेच आक्रमक झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करू, असे आश्वासन दिल्याने त्यांना आता मागे फिरता येणार नाही. शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पूर्ण न केल्यास एक जुलैपासून राज्यातील एकही रेल्वे धावू देणार नाही, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

याआधीही निवडणूक आयोग पारदर्शक राहिलेला नाही, असा आरोप बच्चू कडू यांनी केला होता. अचलपूर विधानसभा मतदारसंघात १० हजार मतदारांची नावे वेळेवर कमी झाले आहेत. या सर्व घोळात निवडणुका घेणे म्हणजे अधिकच संभ्रम निर्माण करणारी बाब आहे. मतदानाचा सर्व नागरिकांना मुलभूत अधिकार आहे, पण माझे मत कुणाला पडले, हेही जाणून घेण्याचा प्रत्येक मतदाराचा अधिकार आहे. निवडणूक आयोग ते मतदान दाखवू शकत नाही. माझे मत मला मिळाले, हे दाखवण्याची निवडणूक आयोगाकडे काय तरतूद आहे. ते निवडणूक आयोगाने सिद्ध करून दाखवावे, हे माझे निवडणूक आयोगाला आव्हान असल्याचे बच्चू कडू म्हणाले होते.

मतदाराचे मत कोणत्या उमेदवाराला गेले, हे जाणून घेण्याची व्यवस्थाच निवडणूक आयोगाच्या सध्याच्या पद्धतीत नाही. काँग्रेससह


## वाघाने घेतला आणखी एक बळी : ग्रामस्थ संतप्त



■ महासागर प्रतिनिधी
ब्रम्हपुरी (चंद्रपूर), दि. १० : ..
चंद्रपूर जिल्ह्यात वाघाचे हल्ले वाढत असून, वाघाने आणखी एका इसमाचा बळी घेतला. ब्रम्हपुरी तालुक्यातील मौजा मेंडकी येथील रहिवाशी भास्कर गजभिये (वय 55) हे मेंडकीलगतच्या जावराबोडी मेंढा या जंगल शिवारात सिंदी आणण्यासाठी गेले होते.

गट क्रमांक 30 खाजगी शेतामध्ये सिंदी तोडत असताना दुपारी 4 वाजताच्या सुमारास वाघाने त्यांच्यावर हल्ला करुन ठार केले. सदरच्या घटनेची माहिती होताच वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तर ब्रम्हपुरी नरड व अधिनिस्त कर्मचारी यांनी मौका स्थळी जाऊन चौकशी केली. वाघाच्या हल्ल्यात भाष्कर गजभिये यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले.

मौका स्थळी पंचनामा नोंद करुन शव उत्तरीय तपासणी करिता ग्रामीण रुग्णालय ब्रम्हपुरी येथे पाठवण्यात आले, घटनास्थळी 5 कॅमेरा ट्रॅप व लाईव्ह कॅमेरा लावण्यात आलेला असून, मानव व वन्यजीव संघर्ष उद्‌भवू नये याकरीता क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना मोठ्या संख्येने तैनात करण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेने गावकरी संतप्त झाले आहेत.



## मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी पुन्हा अजिंक्य नाईक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा अजिंक्य नाईक यांची निवड करण्यात आली आहे. भाजप उमेदवार प्रसाद लाड यांनी सोमवारी दुपारी अचानक अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून काढता पाय घेतला. यामुळे अजिंक्य नाईक यांची या पदावर बिनविरोध निवड होण्याचा मार्ग मोकळा झाला.

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) पदाधिकारी, ॲपेक्स कौन्सिल व टी -20 मुंबई गव्हर्निंग कौन्सिलच्या निवडणुका येत्या 12 तारखेला होणार आहेत. भाजप नेते प्रसाद लाड, आमदार जितेंद्र आव्हाड व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी या निवडणुकीत रस घेतला होता. सत्ताधारी शिवसेनेचे नेते तथा मंत्री प्रताप सरनाईक यांचे सुपुत्र विहंग सरनाईक यांनीही एमसीएच्या अध्यक्षपदासाठी अर्ज केला होता. त्यामुळे या निवडणुकीची रंगत वाढली होती.

तत्पूर्वी, मिलिंद नार्वेकर, प्रसाद लाड, विहंग सरनाईक यांच्यासह भारतीय महिला क्रिकेट संघाच्या माजी कर्णधार डायना एडूलजी यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यानंतर अजिंक्य नाईक यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.

## फोटो कॅप्शन




देशाचा विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि फिक्की यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतंच मुंबईत राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान सर्वेक्षणावर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत फिक्कीचे उपसचिव सुमित गुप्ता, भारताच्या नीती आयोगाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. विवेक कुमार सिंग, वोखार्टचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मुमताज खोराकीवाला, भारत सरकारच्या विज्ञान तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा. अभय करंदीकर या मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

हे सर्वेक्षण म्हणजे एक महत्वाचा राष्ट्रीय उपक्रम असून भारताच्या संशोधन आणि विकास परिसंस्थेचा प्रामाणिक व्यापक नकाशा आणि मूल्यांकनाच्या प्रमुख स्तोत्र असल्याचे मान्यवरांनी सांगितले. देशातील विज्ञान आणि तंत्रज्ञान क्रियाकल्पना समर्पित संसाधनांवर सुरु केलेला आणि तुलनात्मक डेटा हा पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती, धोरणात्मक नियोजन आणि जागतिक बेंचमार्कसाठी मौल्यवान इनपुट प्रदान करतो.

लोकार्थ

या सर्वेक्षणाद्वारे जमा केलेला डेटा ग्लोअब्ल इनोव्हेशन इंडेक्स, नेटवर्क रेडिन्स इंडेक्स, युनेस्को, OECD, WIPO आणि इतर आंतरराष्ट्रीय एजन्सीद्वारे राखले जाणारे शाश्वत डेटाबेस आणि अनेक जागतिक निर्देशांक आणि फ्रेमवर्कची माहिती देतो. ■ ■ ■

## फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंडाचा शुभारंभ

फ्रँकलिन टेम्पलटन (इंडिया) ने गुंतवणूकदारांसाठी फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंड (एफआयएमएफ) या नवीन फंड योजनेच्या शुभारंभाची घोषणा केली आहे.

ही प्रामुख्याने मुदतमूक्त स्वरुपातील इक्विटी फंड योजना आहे. ही योजना विविध घटकांआधारे संख्यात्मक गुंतवणूक धोरणाचा वापर करणार आहे. गुणवत्ता, मूल्य, भावना आणि पर्याय यासारख्या घटकांच्या आधारे समभाग निवडीकरिता फ्रँकलिन इंडिया मल्टी-फॅक्टर फंड डेटावर आधारलेला तसेच सुनियोजित असा दृष्टिकोन वापरणार आहे.



सध्याच्या गुंतवणूक विश्वात बाजार भांडवलीकरणानुसार भारतात ५०० कंपन्या उपलब्ध असून या आघाडीच्या कंपन्या शेअरबाजारात सुचीबध्द आहेत. फंड व्यवस्थापकाच्या अंतर्दृष्टीकोनासह शिस्तबद्ध गुंतवणूक पध्दत तसेच गुंतवणूकीसाठी विशिष्ट प्रारुप (मॉडेल) यांचा मिलाफ घडवत गुंतवणूकदारांना जोखीम-आधारित परतावा प्रदान करणे, हे या फंडाचे उद्दिष्ट आहे.

हा एनएफओ १० नोव्हेंबर २०२५ ते २४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान गुंतवणूकीसाठी खूला राहणार असून प्रति युनिट १० रुपये दराने उपलब्ध राहणार आहे. ■ ■ ■

## हुरून इंडिया द्वारे दानशूरता यादी २०२५ प्रकाशित

एडेलगिव्ह आणि हुरुन इंडियाने एडेलगिव्ह हुरुन इंडिया दानशूरता यादी २०२५ जाहीर केली. भारतातील सर्वात दानशूर व्यक्तींची ही १२ वी वार्षिक क्रमवारी आहे. भारतातील उल्लेखनीय देणगीदारांना अधोरेखित करण्याचा आणि राष्ट्र उभारणीच्या दिशेने भारताच्या दानशूरतेच्या क्षेत्रात वैयक्तिक देणगीदारांचे वाढते महत्त्व लक्षात घेण्याचा हा आमचा प्रयत्न आहे.

१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत देणग्यांचे मोजमाप त्यांच्या रोख रकमेच्या किंवा रोख रकमेच्या समतुल्य रकमेच्या मूल्यावरून करण्यात आले. हे यादीचे बारावे वर्ष आहे आणि ते हुरुन इंडिया रिच लिस्ट २०२५ पासून पुढे आहे, ज्यामध्ये ऑक्टोबर २०२५ मध्ये जाहीर झालेल्या भारतातील १,६९२ सर्वात श्रीमंत व्यक्तींची क्रमवारी आहे. डेटा, पुरावे आणि भौगोलिक दृष्टिकोनातून देशातील परोपकारी देणगी समजून घेण्यासाठी एडेलगिव्ह फाउंडेशन आणि हुरुन इंडिया यांनी या अहवालाच्या निर्मितीमध्ये भागीदारी केली आहे.

या वर्षीच्या एडेलगिव्ह हुरुन इंडिया परोपकारी यादी २०२५ मध्ये अशा व्यक्तींचा समावेश आहे ज्यांनी पुनरावलोकनाधीन कालावधीत INR कोटी किंवा त्याहून अधिक देणगी दिली आहे. भारतीय परोपकार चार प्रमुख संपत्ती-निर्मिती गटांद्वारे आकार घेत आहे, जे एडेलगिव्ह हुरुन इंडिया परोपकार यादी २०२५ मध्ये प्रतिबिंबित झाले आहे. पहिले, अंबानींसारखे बहु-पिढीचे कुटुंब व्यवसाय अजूनही प्रभावी भूमिका बजावत आहेत. दुसरे, नवीन युगातील उद्योजक आणि तरुण नेते जसे की बिन्नी बन्सल आणि इन्फोसिसचे सह-संस्थापक जे या वर्षी यादीत आले आहेत

■ ■ ■

## झोमॅटो आणि ब्लिंकिटची डिलिव्हरी पार्टनर्सची सरकारी योजनांसाठी देशव्यापी मोहीम




शाश्वत कंपन्या -झोमॅटो, भारतातील अन्न ऑर्डरिंग आणि वितरण प्लॅटफॉर्म आणि ब्लिंकिट, एक जलद वाणिज्य प्लॅटफॉर्म, यांनी हकदर्शक यांच्या सहकार्याने, बेंगळुरूमध्ये सरकारी योजना सुविधा शिबिरांच्या मालिकेतील पहिले आयोजन केले. डिलिव्हरी भागीदारांना केंद्र आणि राज्य सरकारच्या महत्त्वाच्या कल्याणकारी योजनांमध्ये प्रवेश मिळवून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

एप्रिल २०२५ मध्ये लाँच झाल्यापासून, या उपक्रमाने विविध सरकारी योजनांअंतर्गत भारतभरातील ६,००० हून अधिक डिलिव्हरी भागीदारांसाठी नोंदणी सुलभ केली आहे, ज्यामुळे १५० कोटी रुपयांपेक्षा जास्त लाभ मिळाले आहेत.

बेंगळुरू कॅम्पने संबंधित केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांमध्ये नोंदणी करण्यासाठी अतिरिक्त २८०+ डिलिव्हरी भागीदारांना मदत केली आहे, ज्यामुळे बेंगळुरू-आधारित डिलिव्हरी भागीदारांची संख्या आजपर्यंत १,००० हून अधिक झाली आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (आरोग्य विमा), रेशन कार्ड, ई-श्रम (असंघटित कामगारांचा केंद्रीकृत डेटाबेस), प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना (जीवन विमा), प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना (वैयक्तिक अपघाती विमा) आणि कर्नाटक राज्य गिग कामगार विमा योजना यासारख्या योजनांमध्ये डिलिव्हरी भागीदारांनी अधिक रस दाखवला आहे.

■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## पार्थ पवारवर कारवाई व्हायलाच हवी..

### वडेट्टीवारांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :
पुण्यातील कोरेगाव जमीन प्रकरण जनतेसमोर आल्यानंतर तो व्यवहार रद्द करण्यात आला असला, तरी चोरी झाली नाही असं होत नाही; चोर तो चोरच अशा शब्दांत विजय वडेट्टीवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांच्यावर तीव्र टीका केली. येथे पत्रकार परिषदेत बोलताना वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले.

त्यांनी सांगितले की, पुणे येथील सरकारी जमीन खासगी व्यक्तींना देण्यात आली होती. अधिकाऱ्यांवर जबाबदारी टाकून सरकार सुटू शकत नाही. जमीन परत केली म्हणजे गुन्हा रद्द झाला असे होत नाही. चोरी झालीच आहे, त्यामुळे पार्थ पवारांवर कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

वडेट्टीवार म्हणाले, मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संस्थेला मीरा रोड येथील सुमारे १०० कोटी रुपये किंमतीची जमीन केवळ चार कोटी रुपयांत देण्यात आली. ही जमीन मूळतः शैक्षणिक आरक्षणाखाली होती, मात्र आरक्षण बदलून सरनाईक यांच्या संस्थेला ती देण्यात आली. मंत्री आणि त्यांच्या नातेवाईकांकडून जमिनी लाटल्या जात आहेत, त्यामुळे या प्रकरणाची चौकशी व्हायलाच हवी, अशी मागणी त्यांनी केली.

वडेट्टीवार यांनी राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वक्तव्यावरही निशाणा साधला. शेतकरी कर्ज घेतात आणि बुडवतात असे वक्तव्य करून विखे यांनी शेतकऱ्यांचा अपमान केला आहे, हे विसरता येणार नाही, असे ते म्हणाले.

## नोव्हेंबरमध्ये भरणार हुडहुडी



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
सध्याच्या वातावरणात पावसाळ्याऐवजी हिवाळ्याचा अनुभव येत असताना, थंडीने हजेरी लावली आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे तापमानात घट झाली आहे. येणारी थंडी हुडहुडी भरवणारी असेल, असे सध्याच्या परिस्थितीवरून दिसून येत आहे.

सायंकाळी ५ नंतर लवकर अंधार पडू लागतो आणि थंडीचा प्रभाव वाढतो. यामुळे लोकरीच्या कपड्यांची दुकाने सजली असून, कपाटात ठेवलेले स्वेटर, मफलर, कानटोप्या, हातमोजे आणि जर्कीन बाहेर काढले जात आहेत. हवामान खात्याच्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबर महिन्यात विदर्भातील अनेक शहरांमध्ये पारा मोठ्या प्रमाणात घसरतो. गेल्या काही वर्षांतील नोंदीनुसार, या महिन्यात किमान तापमान लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे दिसून येते.

ब्रह्मपुरी येथे २४ नोव्हेंबर १९८१ रोजी ६.२ अंश सेल्सिअस तर चंद्रपूरमध्ये २३ नोव्हेंबर १९६८ रोजी ६.२ अंश सेल्सिअस इतके निच्चांकी तापमान नोंदवले गेले होते. नागपूरमध्ये ३० नोव्हेंबर १९१२ रोजी ६.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. आता विदर्भाच्या बहुतेक भागात थंडीला सुरूवात झाली असून, पुढील काही दिवसात गारठा वाढणार असून, यावर्षीची थंडी अधिकच हुडहुडी भरवणारी असेल.

## जहार मोहगाव येथील कविसंमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
श्री राधाकृष्ण मंदिर समितीच्या वतीने कार्तिक पौर्णिमेनिमित्त प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी बालाघाट जिल्ह्याच्या जरामोहगाव येथे आयोजित पाच दिवसीय कार्यक्रमात कवी संमेलनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.




७ नोव्हेंबर रोजी समितीच्या अधिकारी शारदा दहरवाल आणि सरपंच प्रतिनिधी योगेश डोंगरवार यांच्यावतिने कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कवींचे स्वागत करून सन्मान करण्यात आला. प्रसिद्ध कवी संजय अश्क बालाघाटी यांच्या पुढाकाराने आणि राष्ट्रीय कवी दिनेश देहाती यांच्या समन्वयाने, कवी संमेलनाची सुरुवात तरुण कवी किशोर सागर चिपेश्वर बालाघाट यांच्या कवितेने झाली.

प्रथम शारदा मातेच्या प्रतिमेचे यांचे पूजन करण्यात आले. शैलेश इनायत, मिरगपूर, राजेश ठाकूर, मांडला, कवयित्री प्रतिभा पटेल ,जबलपूर, विनोद आणि व्यंग्यांसाठी प्रसिद्ध मुकेश मनमौजी, सामाजिक न्यायाच्या सत्यतेवर रामवृक्ष गुप्ता नागपूर, प्रियंका सजल, गोंदिया आणि सुप्रसिद्ध कवी तन्हा नागपुरी यांनी रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या कवी संमेलनाचे वातावरण त्यांच्या रचनांनी उबदार ठेवले.

विशेषतः संजय अश्क बालाघाटी यांच्या शेरोशायरीने उपथ्सितांना मंत्रमुग्ध केले. सर्व कवींनी उत्कृष्ट कविता सादर केल्या. आपल्या भाषणात आमदार गौरव सिंह पारधी यांनी भगवान राधाकृष्ण मंदिराच्या सुरू असलेल्या कार्यक्रमाबद्दल विचार व्यक्त केले. माजी सैनिक जिल्हा परिषद सदस्य शंकरलाल तांडेकर, अवलेश पारधी आणि मंदिर समितीचे भूमीदाते, परिसरातील पदाधिकारी, काव्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते, शारदा डहरवाल यांनी आभार मानले.